MAHARASHTRA MANDAL OF SOUTH FLORIDA

# दर्पण

March 2024


**दर्पण संपादकीय विभाग**

**संपादिका:** सुजाता साठे

sujatass@hotmail.com



**उप-संपादिका:** राजश्री पालकर

rajipalkar@aol.com



**मांडणी/सजावट:** अपर्णा मटंगे




***अनुक्रमणिका***


| | शीर्षक | लेखक | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय | सुजाता साठे | १ |
| २ | MMOSF चे पान | अपर्णा मटंगे | २ |
| ३. | वेगळ्या वाटेवर | सुजाता साठे | ५ |
| ४ | साहित्याचे माणिकमोती | ललिता गंडभीर, अमित नगरकर, शीला सोगल, लाभेश शेवलकर | १० |
| ५. | आठवणींची शिदोरी | शशीकला लेले, वंदना गुडी | ३२ |
| ६. | खाना खजाना | शीला सोगल, अस्मिता नगरकर | ३९ |
| ७. | सिनिअर्स कॉर्नर | डॉ. नीलकंठ पालकर | ४२ |
| ८ | किड्स कॉर्नर | सान्वी शिंगण, अनन्या जवंजाळ | ४३ |
| ९ | शब्दकोडे | रसिका जोशी | ४५ |



*अस्वीकरण - या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी व चित्रांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय

नवीन वर्ष २०२४ उजाडतांना मी कुठलाही नवीन संकल्प सोडला नव्हता. पण संकल्प न सोडता अचानक मनातली सुप्त ईच्छ्या फळाला आली. आपली नवीन अध्यक्षा अपर्णा मटंगे आणि उपाध्यक्षा राजश्री पालकर ह्यांनी 'दर्पण' ह्या त्रैमासिकाच्या संपादकाची जबाबदारी माझ्यावर टाकली. राजश्री उपसंपादक आणि अपर्णा दर्पणची जुळवणी आणि तांत्रिक बाजू सांभाळणार असे ठरले. हे माझ्यासाठी आवडीचे काम असले तरी त्याचे यश तुमच्या सगळ्यांच्या प्रतिसादावर अवलंबून असणार आहे ह्याची मला जाणीव आहे.

मग प्रश्न पडतो की हा सगळा खटाटोप कशासाठी? मला वाटते आपली सगळ्यांची जी लहानपणापासून मराठीशी नाळ जोडली गेली आहे ती आपल्याला स्वस्थ बसू देत नाही. मग आपण मराठी मंडळे स्थापन करतो, सणवार एकत्र येऊन साजरे करतो. कोणी नवीन मंदिरे उभारण्यात पुढाकार घेतात तर कोणी संगीत, नृत्य अशा भारतीय कला जपण्याचा प्रयत्न करतात. कोणी नवीन मराठी शाळा सुरू करतात तर कोणी बृहन महाराष्ट्र मंडळाची संमेलने आयोजीत करतात. तसाच हा आपला छोटासा खारीचा वाटा! आपल्या मराठी परिवाराला एकत्र आणणे, मदत करणे, आपल्यातल्या कलागुणांना वाव देणे अशा उद्देशाने 'दर्पण' परत सुरू करत आहोत.

ह्या वेळेच्या 'दर्पण'चे नवीन रूप तुमच्या लक्षात येईल. अपर्णाने खूप सुंदर नवीन प्रतीक आणि सजावट केली आहे. राजश्रीचा सर्व कामात सिंहाचा वाटा आहे. ह्या वेळेच्या अंकातले वेगवेगळे लेख, कविता, पाककृती, शब्दकोडे तुम्हाला कसे वाटले आम्हाला जरूर कळवा. आपले मराठीचे धरलेले बोट सुटू नये म्हणून केलेला हा प्रयत्न गोड मानून घ्या. तुमच्याकडून वेगवेगळ्या प्रकारच्या साहित्याची वाट पाहात आहोत. धन्यवाद!

**लेखिका - सुजाता साठे**
sujatass@hotmail.com

## MMOSF चे पान

नमस्कार मंडळी,

*नवीन वर्षी नवा संकल्प, नवीन ऊर्जा नवे प्रकल्प,*

*नव्या कल्पना नवीन मंच, घेऊनि सज्ज हा नवीन संच,*

*करू साजरे सण सोहळे, आनंद देउनी मनमोकळे,*

*करावया तुमचे मनोरंजन, हाच घेतला वसा निरंतन,*

ह्या कवितासंदेशाने १ जानेवारी २०२४ रोजी नवीन कार्यकारणी संचाने, MMOSF २०२४-२०२५ च्या नवीन मंचावर जोमाने काम करायला सुरवात केली. अध्यक्षा अपर्णा मटंगे, उपाध्यक्षा राजश्री पालकर, खजिनदार रसिका जोशी, समिती सचिव केदार सरदेसाई, सोबत Food Committee मध्ये अस्मिता नगरकर, मकरंद जोशी, योगेश जोग, रोहन पोताडे, मयूर पाटील आणि Cultural Committee मध्ये कांचन जोग, संकल्पा हुद्देदार, जाई पोताडे, डॉ दिशा आणि डॉ. गौरी मानकामे, अमित नगरकर, संतोष अमराडकर असा १६ जणांचा संच पुढील दोन वर्षे MMOSF साठी कार्यरत राहण्यासाठी सज्ज झाला.

२०२४ चा पहिला कार्यक्रम 'Sankranta Family Event' हा होता. जानेवारी २७ रोजी, Weisinger Community Center, Margate मध्ये खूप जोशपूर्ण आणि उत्साहाने हा कार्यक्रम साजरा झाला. ह्या कार्यक्रमाला इतका उदंड आणि भरघोस प्रतिसाद मिळाला की venue capacity इतके रेजिस्ट्रेशन दिलेल्या तारखेच्या तब्बल एक आठवडा आधीच झाल्यामुळे registration बंद करावे लागले, ज्यामुळे खूप जणांना ह्या कार्यक्रमात सामील करता येत नसल्याची खंत मात्र राहिली. पण venue capacity पायी हा निर्णय घेणं अत्यावश्यक होते आणि अनिवार्य देखील. MMOSF च्या सभासदांचे स्वागत सर्वप्रथम कोकम सरबत देऊन झाले. त्या सोबत हळदी कुंकू, तिळगुळ आणि वाण देऊन लहान

मुले व काही मोठी मंडळी देखील पतंग उडवायला सज्ज झाली. यंदाचे वाण, अपर्णा च्या आई.डॉ. विद्या भिडे यांनी खास घरी तयार केले. Battery operated Flameless candles वर सूर्याचे चिन्ह आणि त्यावर सुबक सजावट, हे यंदाच्या वाणाचे वैशिष्ट. तसेच नवीन रचनेचा photobooth कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला. दुपारच्या जेवणाचा खास मराठमोळा बेत होता. पुरी, रस्सा भाजी, मटकीची उसळ, टोमॅटो सार, मसाले भात, कोशिंबीर, पापड, लोणचे, खास मुंबईहुन आलेली गुळाची पोळी आणि नंतर पान, अशी मेजवानी उपस्थित लोकांच्या पसंतीस आली. जेवणानंतर, सर्व जमलेल्याना घेऊन मजेदार खेळ खेळण्यात आले आणि कार्यक्रमाचा गोड शेवट चहा आणि नानखटाई ने झाला. ह्या कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये दाखवणारा विडिओ आपण सर्वांनी पाहिला असेलच.

या वर्षीचा दुसरा कार्यक्रम म्हणजे 'आईच्या गावात मराठीत बोल' हा चित्रपट! हा चित्रपट दाखवण्याबद्दल घेतलेल्या मतदानाला इतका उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला की MMOSF ने ४ February रोजी Coral Springs Paragoan theatre भाड्याने घेऊन चित्रपट प्रदर्शित केला. २०१६ साली दाखवलेल्या 'कट्यार काळजात घुसली' ह्या चित्रपटानंतर MMOSFच्या आत्तापर्यंतच्या कारकिर्दीतला housefull जाणारा हा दुसरा चित्रपट आहे! त्यासाठी सर्व MMOSF परिवाराचे खूप कौतुक, ज्यांच्यामुळे housefullची पुर्नरावृत्ती झाली आणि एक हलका फुलका, मनोरंजक चित्रपट दाखवता आला. ह्याची ठळक वैशिष्ट्ये दाखवणारा विडिओ देखील आपण सर्वांनी पाहिला असेलच.

मार्च ८ हा जागतिक महिला दिवस म्हणून साजरा केला जातो. यंदा MMOSF ने 'Understanding Your Financial Future' हे चर्चासत्र आयोजित केले होते. त्यासाठी Financial Services Professional रेश्मा नानावटी, ह्या खास Atlanta हुन हे माहिती सत्र देण्यासाठी आल्या होत्या. महिला दिनाचे औचित्य होते खरे, पण हा विषय अतिशय महत्वाचा आणि सर्वांच्या गरजेचे असल्याने, अनेक MMOSF सभासदांनी ह्या सुवर्ण संधीचा फायदा घेतला. Will, Trust, Estate planning, Life Insurance, 401K, IRA, social security अश्या अनेक मुद्द्यांवर सविस्तर माहिती रेश्मा

नानावटी ह्यांनी दिली. तसेच लोकांना त्यांचे प्रश्न आणि संदेह मांडायची संधी देखील ह्या चर्चासत्रात उपलब्ध झाली.

मार्च महिना म्हटला की सर्वांना ज्याची चाहूल लागते, ती म्हणजे होळी आणि गुढी पाडव्याची. सालाबाद प्रमाणे यंदा देखील, March ३० ला Patch Reef Park मध्ये, होळी व पाडवा सहल आयोजित केली आहे. यंदाचे खास आकर्षण असणार आहे 'unlimited dosa station' आणि मुंबईहुन खास ऑर्डर केलेली पुरणाची पोळी!! होळीच्या रंगात रंगायला आणि दरवर्षी प्रमाणे, यंदा देखील हा सण मोठ्या प्रमाणात आणि उत्साहात साजरा करायला नक्की या!!

ह्या सर्व कार्यक्रमाच्या संगतीने MMOSF membership drive देखील चालू आहे. ह्या Membership मुळे सर्व वर्षांच्या कार्यक्रमाचा आराखडा रचायला, कार्यक्रमाची मांडणी करायला, त्यासाठी लागणाऱ्या जागा राखून ठेवायला, कार्यक्रमासाठी लागणाऱ्या काही गोष्टी मागवायला किंवा त्या इथेच तयार करायला खूप वेळ मिळतो व खूप मदतही होते. सांगायला अतिशय आनंद होत आहे की २०२४च्या Membershipचा आकडा १००च्या वर गेला आहे. आमच्यावरच्या विश्वासाची, प्रेमाची, आणि सहकार्याची तुम्ही दिलेली ही खरी पावती आहे. ज्यांनी membership घेतली आहे त्यांचे खूप खूप आभार, आणि ज्यांनी अजून नाही घेतली त्यांनी जराही विलंब न लावता membership घ्यावी ही विनंती.

**लेखिका - अपर्णा मटंगे**
president@mmosf.org

## वेगळ्या वाटेवर

### नाटक आणि बरंच कांही....

आजच्या आपल्या वेगळ्या वाटेवरच्या पहिल्याच भागात एका नाटकात रमणाऱ्या गुणी कलावंताची ओळख करून देतांना मला खूप आनंद होतो आहे. नावाप्रमाणेच मधुर व्यक्तिमत्वाची मधुरा गोडबोले कणगलेकर सध्या तिचे पती इंद्रनील व मुले ओजस(13 वर्षे) व इरा(11 वर्षे) ह्यांच्यासोबत जुपिटर, फ्लोरिडा इथे राहते. ती लग्न झाल्यावर २००६ पासून अमेरिकेत आहे. पण २०१९ जून ते २०२३ जुलै ही चार वर्षे ती व मुले भारतात पुण्याला राहिले. ह्या अवघ्या ४ वर्षात (त्यात ८-10 महीने कोविडमुळे सर्व व्यवहार बंद होते) तिने प्रायोगिक रंगभूमीवर दोन मराठी व एका हिन्दी नाटकात काम करून एकूण ७८ प्रयोग केले व आपल्या कामाचा तिथे ठसा उमटवला. तिच्या ह्या यशस्वी प्रवासाची ओळख तिच्याशी मारलेल्या गप्पांमधून करून घेऊ या.

**मी**: "मधुरा, आपण सुरवात तुझ्या लहानपणापासून करू या. तुझे लहानपण कुठे व कसे गेले? लहानपणापासून नाटकाची आवड होती का?"

**मधुरा**: "मी सोलापूरची आहे. जन्म व १२ वीपर्यंतचे शिक्षण सोलापूरच्या ज्ञान प्रबोधिनीमध्ये झाले. माझ्या आईला नाटकात काम करायची आवड होती व तिने हौशी रंगभूमीवर अनेक नाटकातून काम केलेले आहे. मी चौथीत असतांना श्रुती मंदिरतर्फे तेंडुलकरांच्या 'बॉबीची गोष्ट' ह्या नाटकात काम केले होते व त्यासाठी बक्षीसही मिळाले होते. नंतर ९ वीत असतांना ब. मो. पुरंदऱ्यांच्या 'जाणता राजा' ह्या प्रसिद्ध नाटकात शिवाजीच्या बायकोचे सकवारबाईंचे काम केले. ह्या नाटकाचे सोलापूरमध्ये १० प्रयोग झाले. तसेच १०वीमध्ये राज्यनाट्य स्पर्धेत मधुसूदन कालेलकरांच्या 'पेईंग गेस्ट' ह्या विनोदी नाटकात काम करून बक्षीस मिळाले. ह्या सर्व प्रवासात श्रुती मंदिरच्या विद्या काळेबाई आणि आमच्या शाळेतील कौस्तुभ गोडबोलेसरांचे मार्गदर्शन झाले."

**मी**: "म्हणजे लहानपणापासूनच तुला नाटकाची आवड होती तर! आणि बरेच काम करून बक्षिसेही मिळवलीस. मग बारावीनंतरचे शिक्षण कुठे झाले?"

**मधुरा**: "त्याआधी ११ वीनंतरचा माझ्या आयुष्यातला एक महत्वाचा टप्पा सांगावा लागेल. मला ११ वीमध्ये असतांना रोटरी क्लबतर्फे जर्मनीला एक वर्ष जाण्याची संधी मिळाली. पण अडचण अशी होती की मला जर्मन भाषेचा गंधही नव्हता. मग पुण्याला मॅक्सम्युलर भवनमध्ये १ महिना कामापुरती जर्मन भाषा शिकले. जर्मनीच्या उत्तरेला असलेल्या नॉरडरनी ह्या छोट्याश्या बेटावर स्टुडंट एक्सचेंज प्रोग्राममध्ये मी एक वर्ष राहिले. हे बेट फक्त पर्यटकांवर (टुरिझमवर) अवलंबून आहे. मी ज्या Kanngieser कुटुंबात राहिले त्यांचे एक हॉटेल व कॅफे होता. थंडीच्या दिवसात सगळे बंद! मला तिथला अनुभव खूपच आवडला







व ते कुटुंब माझे दुसरे घरच झाले. ते सर्व माझ्या लग्नासाठी भारतात आले होते. अजूनही जमेल तेव्हा आम्ही एकमेकांना भेटतो."

**मी**: "अरे वा! तुला छानच अनुभव मिळाला. मग एक वर्ष राहिल्यावर जर्मन भाषाही छान बोलत असशील."

**मधुरा**: "हो ना! मग १२ वीनंतर मी पुण्याला Cummins Engineering College मध्ये Instrumentation and Controls ह्या विषयात पदवी मिळवायला आले. तिथली चारही वर्षे आमच्या कॉलेजतर्फे पुरुषोत्तम करंडक व फिरोदिया करंडक ह्या प्रसिद्ध स्पर्धांमध्ये नाटकात कामे केली. शेवटच्या वर्षीतर आम्हाला पुरुषोत्तम करंडकचे सर्वोत्कृष्ट नाटकाचे व मला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचे बक्षीस मिळाले. नाटकाचे नाव 'गिनी पिग' असे होते. त्याचे आम्ही ७-८ प्रयोग केले व ते नाटक तेव्हाच्या Alfa टीव्हीवर दाखवले गेले. त्यानंतर मला मराठी सिनेमात व सिरियल्समध्ये काम करण्यासाठी विचारले होते. परंतु तेव्हा मला माझ्या करियरसाठी जास्ती शिकायचे होते. त्यामुळे मी नकार दिला."

**मी**: "मग पुढचे शिक्षण कुठे घेतलेस?"

**मधुरा**: "पुण्याला एक वर्ष कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी इथे नोकरी करून मी परत जर्मनीला आले. तिथे Furtwangen University मध्ये बायोमेडीकल इंजीनीरिंगमध्ये मास्टर्सची डिग्री मिळवली. दोन वर्षांचा अभ्यासक्रम मी एका वर्षातच उत्तम मार्क मिळवून पूर्ण केला. मग एक वर्ष जर्मनीत TR-Electronic इथे नोकरी करून मी भारतात परत आले."


**मी**: "पुढे लग्न, अमेरिकेत स्थलांतर ह्यामध्ये नाटक मागे पडले का?"

**मधुरा**: "हो. २००५ च्या डिसेंबरमध्ये इंद्रनीलशी लग्न होऊन आम्ही शिकागोला आलो. तिथे मी F2 व्हिसावर असल्याने मला नोकरी करता येत नव्हती. म्हणून शिकागोच्या Loyola University मध्ये Scientific and Technical Computers मध्ये MS केले."

दोन मास्टर्स डिग्रीज? एव्हाना माझ्या लक्षात आले होते की मी नाटकासाठी हिची मुलाखत घेते आहे खरी पण मधुरासाठी शिक्षण व करियरही तेवढेच महत्वाचे आहे. व्हिसा मिळाल्यावर एक वर्ष लॉस ॲनजेलिसला Baxter Bioscience मध्ये नोकरी करून २००९ मध्ये दोघे मायामीला आले. तिथे Beckman Coulter इथे नोकरी करत असतांनाच २०१० मध्ये ओजस व २०१२ मध्ये इराचा जन्म झाला. नंतर Zimmer Biomet, Inc इथे ३ वर्षे २०१६ ते २०१८ डिसेंबरपर्यंत नोकरी केली. मधल्या काळात LA च्या अभिव्यक्ति ह्या नाटकाच्या ग्रुपमध्ये व MMOSF मध्ये छोट्या नाटकातून कामे केली.








**मी**: “सगळे व्यवस्थित चालले असतांना भारतात जायचा निर्णय कसा घेतलास?”

**मधुरा**: “मला नेहेमीच भारतात परत जायची इच्छा होती. मुले मोठी झाल्यावर ते कठीण झाले असते. शिवाय पुण्यात जाणार असल्याने नाटकात काम करता येईल अशीही आशा होती. त्यामुळे २०१९ च्या जूनमध्ये मी व मुले पुण्याला गेलो. इंद्रनील नंतर भारतात जॉब शोधून येणार होता.”

**मी**: “पुण्याला गेल्यावर काय अडचणी आल्या? मुलांना तिथे आवडले का?”

**मधुरा**: “मी पुण्याला माझ्या सासू-सासऱ्यांच्या जवळच घर भाड्याने घेतले. मुलेही शाळेत रमली. मग मी नाटकासाठी ऑडीशन देणे सुरू केले. तेव्हाच माझी प्रदीप वैद्य ह्यांच्याशी ओळख झाली.”

इथे प्रदीप वैद्य ह्यांच्याविषयी थोडे सांगावेसे वाटते. ते व्यवसायाने डॉक्टर असले तरी त्यांचे खरे प्रेम मराठी रंगभूमीवर आहे. ते गेली २० वर्षे लेखक, दिग्दर्शक, लाइट डिझायनर, गायक, थिएटर मॅनेजर अशा अनेक गोष्टी करत आहेत. त्यांनी व त्यांची पत्नी रूपाली ह्यांनी पुढाकार घेऊन पुण्यामधले ‘द बॉक्स’ हे नवे थिएटर (ज्याला ब्लॅक बॉक्स थिएटर असेही म्हणतात) ते सुरू केले. पुणे हे मराठी नाटकांचे सांस्कृतिक केंद्र समजले जाते. अशा पुण्यात नवीन कलाकारांना वाव मिळण्यासाठी एक नव्या प्रकाराचे थिएटर जरूरी आहे असे त्यांना वाटले. ‘द बॉक्स’ ही एक चौकोनी आकाराची उंच सीलिंग असलेली जागा असून आत काळ्या रंगाने रंगवलेली आहे. आतली जागा दिग्दर्शकाला पाहिजे तशी वापरता येते. त्यात गाण्याचे प्रोग्राम, इतर प्रदर्शने, प्रायोगिक नाटके असे वेगवेगळे प्रकार होऊ शकतात. बसण्याची व्यवस्था, प्रकाशयोजना दिग्दर्शकाला


पाहिजे तशी वेगवेगळ्या प्रकाराने करता येते. मधुराला प्रदीप वैद्यांच्या 'काजव्यांचा गाव' ह्या नाटकात काम मिळाले.

**मी**: "'काजव्यांचा गाव' मध्ये काम करण्याचा अनुभव कसा होता?"

**मधुरा**: "'काजव्यांचा गाव' माझे खूप आवडते नाटक आहे. एका कोकणातल्या कुटुंबाची ही गोष्ट आहे. त्यातल्या आईचा ८०व्या वर्षांचा वाढदिवस असतो व त्या निमित्ताने तिची सगळी मुले व नातेवाईक एकत्र जमतात. त्यात तिच्या अमेरिकेतून आलेल्या मुलीचे काम मी करते. त्यात मानवी स्वभावाची गुंतागुंत खूप छान पद्धतीने उलगडून दाखवली आहे. 'कोरा कॅनव्हास' ह्यामध्ये एकूण स्त्री असण म्हणजे नक्की काय, मूल हीच स्त्रीची ओळख आहे की तिची दुसरीही ओळख असू शकते, तसेच लेस्बियन स्त्रियांचा प्रश्न हाताळला आहे. तर 'घर के अंदर' हे महाराष्ट्र कल्चरल सेंटरच्या सुदर्शन थिएटरचे रूपाली गोडांबे ह्यांनी लिहिलेले नाटक आहे. लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर 'घर' म्हणजे नक्की काय हे प्रश्न विचारणारे दोन अंकी हिन्दी नाटक आहे.



Kajvyancha gav on stage





Kajvyancha Gav




**मी**: "'द बॉक्स' ह्या थिएटरमध्ये काम करण्याचा अनुभव कसा होता?"

**मधुरा**: "खूप नवीन अनुभव होता तो माझ्यासाठी. प्रेक्षक अगदी दोन फुटावर बसलेला असल्याने चुकीला अजिबात जागा नाही. तसेच आपल्या भूमिकेमधून क्षणभरही बाहेर येऊन चालत नाही. लगेच लोकांच्या लक्षात येते. अगदी समरस होऊन काम करावे लागते. पण बरोबर काम करणारे सर्व लोक उत्तम अभिनय करणारे होते व आमचे सर्वांचे खूप छान जमायचे."

**मी**: "घर व मुलांचे सर्व सांभाळून एवढ्या प्रयोगात काम करणे नक्कीच सोपे नसणार."

**मधुरा**: "नाही ना. पण माझे आईवडीलही मी या म्हणाले की लगेच माझ्याकडे येऊन राहायचे. तसेच जवळच राहत असल्यामुळे मला सासू सासऱ्यांचीपण खूप मदत झाली. त्यांच्या मदतीशिवाय हे शक्य झाले नसते."

**मी**: “तुझ्या कामाबद्दल काय प्रतिक्रिया होती?”

**मधुरा**: “माझे काम सर्वांना आवडले. पण काही लोक असेही म्हणणारे होते की ‘तू अमेरिकेत राहतेस आणि तिथून आलेल्या मुलीचेच काम करतेस. हयात तुला कठीण काय आहे?’ तसेच तू अगदी वर्षा उसगावकरांसारखी दिसतेस हे तर खूपजण सांगायचे. आमच्या नाटकाला पृथ्वी थिएटरच्या संजना कपूर (प्रसिद्ध अभिनेते शशी कपूर ह्यांची मुलगी) आल्या होत्या. त्यांना काजव्यांचा गाव नाटक खूप आवडले आणि



त्यांनी आम्हाला मुंबईला येऊन पृथ्वी थिएटरला प्रयोग करण्याचे आमंत्रणही दिले. ह्याशिवाय मोहन आगाशे, शुभांगी दामले, सुनील सुखटणकर अशा अनेक विख्यात मराठी कलाकारांनी नाटक पाहून आमचे कौतुक केले आहे. नाटकाशिवाय मी एक शॉर्ट फिल्म, काही जाहिराती व मॉडेलिंगचेही काम केले. कॅमेरासमोर काम करायचा अनुभव माझ्यासाठी नवीनच होता.”

**मी**: “आता परत आल्यावर पुढे काय प्लॅन्स आहेत?”

**मधुरा**: “इथे परत आल्यावर मी उमेश कुलकर्णी ह्यांचे शॉर्ट फिल्मबद्दलचे ऑनलाइन वर्कशॉप केले. काही ठिकाणी ऑडीशनही दिले आहेत. इथे एका विनोदी नाटकात स्थानिक लोकांबरोबर काम केले. मी डिसेंबर २०२३मध्ये पुण्याला गेले होते. तेव्हा ‘काजव्यांचा गाव’चे तिथे चार प्रयोग केले. आता जून-जुलैमध्ये पुण्याला परत जाऊन आणखी काही प्रयोग करीन. सध्या ‘जगातभारी प्रॉडक्शन्स’, फिनिक्स, ॲरिझोना ह्यांच्या एका शॉर्ट फिल्ममध्ये काम करत आहे. निवडली गेली तर ही फिल्म NAFA(North American Film Association) ह्यांच्यातर्फे जुलै २०२४ San Jose, CA मध्ये होणाऱ्या मराठी फिल्म फेस्टिवलमध्ये दाखवण्यात येईल. तसेच आता परत जॉबही सुरू करायचा आहे. त्यासाठी थोडे ट्रेनिंग घ्यायचा विचार आहे.”

परत आल्यावरही पुण्याला जाऊन प्रयोग करणाऱ्या मधुराचे मला कौतुक वाटले. तिच्या नाटकाच्या आणि इतर माध्यमातील कामाच्या पुढील प्रवासासाठी खूप शुभेच्छा!

काजव्यांचा गांव facebook page: https://www.facebook.com/kajawyanchagaav

Short Film: https://youtu.be/brI664mneic

Madhura’s email: madhuragodbole@gmail.com

**लेखिका - सुजाता साठे**
sujatass@hotmail.com

# साहित्याचे माणिकमोती

## *Tomya the dog*




*Photo of a dog that looks just like Tomya (by photographer Jamie Street via Unsplash*

When I was growing up in Pune, in a bungalow with extended family, Tommy (or "Tomya") was our dog. He was a small brown mutt with sad eyes that made people, especially children, pity him and try to pat him. Sometimes Tomya welcomed their attention. But other times, without any other expression of his annoyance, he would bite them and run away.

As a puppy, Tomya had belonged to an English family that planned to return to England from India. They needed a family to adopt him. My older cousin Vasant liked the cute puppy and brought him home. My Aunt Honibai and my grandfather, Kaka, loved the puppy, and decided to keep him. Even though Tomya was in fact a totally Indian dog, our family pronounced him to be English, and gave him the English name Tommy* (or the Indian version, "Tomya.") For a long

time, I told my friends that Tomya was English, because a British family had owned him. They believed me.

Kaka and Honibai were Tomya's primary caretakers.

When Tomya was a puppy, he fell from the stairs, and got a head wound, which bled profusely, and required seven stitches. According to Honibai, the fall had given him a brain injury, which affected his temperament, causing him to bite people. Honibai's implication was that it wasn't Tomya's fault that he bit people.

Only Honibai and Kaka could feed Tomya. His food, which was leftovers from what we ate, was served in an English (meaning aluminum) dish. To feed him, Kaka tied him to a balcony railing. A loud announcement would be made: "Tomya is eating!." b Because if anyone got too close while he was eating, Tomya would bite them. Only Kaka or Honibai could safely walk within the circumferencerange of that Tomya could reach. Someone had to watch out for young children. Once he had finished his food, he would curl up and sleep.

In the morning, which was a busy time of day in the household, Kaka or Honibai would tie Tomya to a balcony railing. He would alternately whine, bark, or howl, disturbing any children who were trying to study, and any family trying to listen to the radio.

Finally, sick of the noise, someone would lock all the doors leading out of the second floor, and, after loudly announcing, "Tomya is free! Do not open the doors!," would set Tomya loose. Tomya would stay where he was until someone inevitably forgot the announcement, and opened a door. Then Tomya would shoot out the door and out of the yard. Then Nno one could catch him. He would wait on the road, and when anyone left the house, he would chase them to wherever they were going.

My Uncle Gangakaka was usually the first person out of the house. He had to catch a bus to get to work. Tomya would chase him to the bus stop, and then chase the bus, before eventually coming home, looking for a second person to chase. That person was often me.

I walked to school every morning, and every morning, Tomya would chase me. I tried to hide from him in temples along the way, hoping he would go back home. Sometimes he did, but I would end upended up late to school, , and would be punished.

At that time, a few people in the area had water buffalo herds, which they would walk to pastures outside Pune. Sometimes I would walk back towards home in the middlest of a herd, hoping Tomya would go back. Tomya had once chased a water buffalo, who had kicked him and

dropped dung on him. He lay on the roadside, injured and covered in buffalo dung, until a neighbor noticed him, and informed the family. Kaka wrapped him in a blanket, and carried him home. He washed Tomya and fed him mutton soup. After a week, Tomya had recovered, but the incident had left him mortally afraid of water buffalo. I could get rid of him by walking among the buffalo, who were usually docile. But I was endangering myself.

If I could not lose Tomya, and he made it to school, I had to walk back home. He would follow me. By that time, he would be hungry, and would go into the house, where Honibai would tie him up. I would return to school, having already missed a class or two.

When family members travelled, they hired a tonga (a horse-drawn carriage) to go to the train station with their luggage. Then Tomya chased the tonga to the station. Following the family members, he managed to sneak past the ticket collector onto the platform, and then tried to jump onto the train. But the carriage entrance was too high for him. When the train started moving, he chased the train past the platform as far as he could.

Other travelers were impressed. “What a loving, loyal dog!” they said.

Tomya was unpredictable. If someone started to pet him, he would welcome it. He would jump on them, wagging his tail. But sometimes he would suddenly change his mind, and bite the person.

The family endlessly discussed how he chose his victims. According to Honibai, he bit people who looked cross. That was not true. He would be sleeping in a corner, suddenly wake up, bite a person reading the newspaper, and take off. Tomya bit me and my cousins many times. His bite was superficial, like a scratch. Honibai, who was always partial to Tomya, blamed the children. She would rub a cotton swab soaked in iodine on the wound, and ask, “Did you tease Tomya?” Never mind that I had done nothing more than walk into the room when Tomya decided to bite me.

I accused her of loving the dog more than she loved me. She said, “You can talk. Tomya is a poor dumb animal.”

Eventually Over time he bit my friends and other cousins’ friends, the mailman, guests, deliverymen, and the businessmen who visited my father, Baba. People started to stand on the road and yell, “Is the dog tied up?” before they would come in. Outside of our yard they were safe; Tomya only bit people when they came through the front gate into the front yard.

Tomya also chased men who rode bikes on the road in front of our bungalow, entangling himself in the back wheel. And he would chase cars and tongas. Inevitably,Finally, a horse would kicked him, so he stopped chasing tongas. Occasionally a cyclist complained. Honibai had the nerve to blame the cyclists. “Our dog chases people who don’t dress properly,” she would say. Or, “Our dog knows when people are mad at him.” Most of the cyclists were young college students. They could not fight argue with an older woman. They didn’t argue, and went away. Her irrational arguments astonished my father.

When Tomya bit a child, the parents showed up, and a fight started. My father, Baba, promptly left the home from a side door.

Honibai again stepped forward. As usual, she blamed the child.

Faced with a furious man, she had the ultimate weapon. “I will poison and kill the dog,” she said.

In our nonviolent, Hindu culture, killing a dog was unacceptable. The angry parent suddenly changed their tune. “No. No. Please don’t kill the dog; Keep him tied up, or send him to a farm.”

Baba hoped Tomya would get himself killed. But like a cat, he Tomya had nine lives. He was survived being kicked by a horse and a water buffalo, but survived. Then, when he was chasing a car, a front wheel hit him, at least according to witnesses. He was unconscious for a while. But after a few days, he was himself again.

In Pune, the river flooded during heavy monsoon rains. People went to a bridge called Lakadi Pul** to watch the wild river. Some adventurous souls jumped into the gushing water. My cousins had gone to see the flooding river. Tomya had followed them. One of them said, “Tomya will be able to swim in the river.” The other said, “No, he will drown.” So tThey made a bet, and threw Tomya into the river. He vanished.

Honibai and Kaka were furious. Baba and my Aunt Akka were relieved.

Tomya was missing for three days. Then he showed up.

After one peaceful month, he resumed his biting and chasing routine.

As usual, the family could not decide how to deal with Tomya.

Akka really disliked him. Honibai and Kaka loved him. Baba would have tolerated him, if Tomya had not bitten so many people. Rabies was prevalent in Pune then, but no one worried

about it.


Finally, Baba decided to send him away. Tomya was sent off on a truck. The truck dropped him in a remote village. After a couple of months, he returned. He stayed for a few months and restarted his biting routine.

Finally, Baba had him tied up in a sack, and asked a truck driver to set him free in a remote village.

This time Tomya did not return.

Honibai was sad. Sometimes I still dream that I am walking to school and Tomya is chasing me.

** In India, pets were often given English names.*




**This essay was originally published in *Featured Creatures* by Lalita Gandbhir, a book about her animal-loving family. The book is available on Amazon.**

**By Lalita Gandbhir**

लेखिका - ललिता गंडभीर
617-308-3045 (TEXT MSG ONLY)

## साहित्याचे माणिकमोती

# मिसमॅच लग्नगाठ

आईचा व्हिडीओ कॉल ठेवला आणि उरलेला प्रखर दिवस आभासमोर काळोखी घेऊन आला. आता काय करावे हा प्रश्न तिच्यासमोर उभा राहिला आणि उत्तर माहीत नसल्याने ती भांबावून गेली. तसे बघायला गेले तर नुकतेच लग्न करून अमेरिकेत आलेली ती नववधू होती. तरी सुद्धा अशा मनस्थितीला आणि असे प्रश्न पडायला कारणही तसेच होते.

आभा ही मध्यमवर्गीय सुखवस्तू कुटुंबातील हॅपी गो लकी मुलगी होती. कॉलेज शिक्षण होईपर्यंत तिला कधीच कुठल्याच गोष्टीकरता हट्ट सुद्धा करावा लागला नव्हता. कॉलेजमधून कॅम्पस इंटर्व्यूमध्ये तिचा सगळा ग्रुप एकाच कंपनीत सिलेक्ट झाला होता. त्यामुळे कॉलेज लाईफची धम्माल नोकरीत सुद्धा चालू होती. अशा परिस्थितीत सगळे जवळचे नातेवाईक गावातच असताना हे गाव आणि हा देश सोडण्याचा विचार आभाच्या स्वप्नातही येऊ शकला नसता. पण त्याचवेळी अत्यंत ओळखीचे असीमचे स्थळ आले आणि माशी शिंकली.

आभाचे वडील आणि असीमचे वडील हे अत्यंत चांगले मित्र. त्यामुळे दोन्ही कुटुंबात खूप चांगले संबंध. असीम हा पहिल्यापासून स्कॉलर. स्कॉलरशिपवर शिक्षणासाठी अमेरिकेत गेलेला आणि एका चांगल्या कंपनीत नोकरीला लागून तिथेच सेटल झालेला. लग्नाच्या बाजारात 'मोस्ट एलिजीबल बॅचलर' अशी ही दोन्ही स्थळं. त्यामुळे एका कॉमन फ्रेंडने असीमसाठी आभाचे स्थळ सुचवले आणि दोन्ही कुटुंब एका पायावर तयार झाली.

आभाचा विरोध हसण्यावारी नेऊन असीमच्या भारतभेटीच्या पहिल्याच मुहूर्तावर 'आधुनिक कांदेपोहे' कार्यक्रमासाठी आभा आणि असीम ठरलेल्या हॉटेलमध्ये भेटले. आभाला आपला गाव आपला देश सोडायचा नसल्याने आणि असीमला आत्ता लग्न करायची इच्छा नसल्याने दोघांची भेट कपाळावर आठ्या घेऊनच सुरू झाली. फार जास्त बोलणे झाले नसले तरी ह्या लग्नाला दोघेही तयार नाहीत हे दोघांनाही लक्षात आले. समोरच्याला नकार द्यायचा असे ठरवून आलेल्या दोघांनाही समोरच्याने नाकारणे जिव्हारी लागले. त्या तिरमिरीत दोघांनी घरी जाऊन आपल्या परीने आपापला नकार सांगायचा प्रयत्न केला.

दोन्ही घरी गोष्टी किती पुढे गेल्या आहेत हे दोघांनाही माहीत नव्हते. दोघांच्याही आया इमोशनल ब्लॅकमेलिंग करायला आणि वडील ब्रेनवॉशिंग करायला लागले आणि शेवटी दोघेही बोहोल्यावर चढले. लग्न समारंभ कसा झाला, दोन दिवसांची कोल्हापूरची देवदर्शनाची ट्रीप कशी झाली, आभाचा व्हिसा

इंटरव्ह्यू कसा झाला आणि त्यांचा अमेरिकेत ह्या घरापर्यंतचा प्रवास कसा झाला, ह्यातील काहीच नक्की आठवत नव्हते, इतके ते दोघेही बधिर झाले होते.

आपआपल्या घरी दोघांनाही या लग्नासाठी नकार देता आला नव्हता. त्याचा दोष दुसऱ्याला देत बसल्याने दोघेही जरा घुश्शातच होते. दोघांच्यात अत्यंत गरजेपुरते बोलणे झाले असेल नसेल. घरी आल्यावर फॉरमॅलिटी असल्याप्रमाणे असीमने आभाला घराची जुजबी ओळख करून दिली आणि चक्क तो दुसऱ्याच दिवशी त्याच्या कामावर रुजू झाला. काल पर्यंत दिवसभर ऑफिसमध्ये संपूर्ण दिवस बिझी असणाऱ्या आभाला हे रिकामपण एकदम अंगावर आले. काय करू काहीच सुचेनासे झाले. घरभर फिरून झाले, थोड्यावेळ झोपायचा प्रयत्न करून झाला, जेवणासाठी स्वयंपाकघरात खुडबुड करून झाली, आईला व्हिडिओ कॉल करून जबरदस्तीने लग्न लावल्याबद्दल आगपाखड करून झाली, पण कशातच लक्ष लागत नव्हते. दुष्काळात तेरावा म्हणजे लॅपटॉप काढला तर बॅटरी डाउन आणि भारतातील चार्जर इथे लागत नव्हता आणि घरात शोधूनसुद्धा पिन कन्व्हर्टर किंवा दूसरा चार्जर मिळायला तयार नाही. रडकुंडीला येऊन बिचारी टीव्ही लाऊन काहीबाही बघत सुन्नपणे बसून राहिली.

आपले लग्न लावणाऱ्या आईबाबांचा तिला खूप राग येत होता. त्याहून जास्त राग तिला असीमचा यायला लागला होता. त्यानेच लग्न करून इथे असे परदेशात आणले होते आणि साधे एक दिवस घरी राहून नीटपणे कुठे काय आहे हे ही सांगावेसे वाटले नव्हते. एकतर त्यालापण लग्न करायचे नव्हते. मग त्याने हे लग्न केलेच का? एक मुलगी म्हणून तिला खूप जास्त विरोध करता आला नव्हता पण तो तर नक्कीच करू शकत होता विरोध. आपल्यालाही लग्न करायचे नाही हे आपण त्याला स्पष्टपणे सांगितले होते. त्याला तो त्याचा अपमान तर वाटला नसेल? म्हणूनच तर मुद्दाम त्याने हे लग्न केले नसेल? आपल्याला शिक्षा म्हणून? आता पुढे कसा आणि काय वागणार आहे हा आपल्याबरोबर?

‘खाली दिमाग शैतान का घर होता है’... करायला काहीच नसल्याने आभाच्या रिकाम्या डोक्यात नाही नाही ते विचार येऊ लागले होते. त्यात सकाळी घरातून बाहेर पडल्यापासून असीमने एक साधा फोनसुद्धा केला नव्हता. कोणे एके काळी लग्नाची आणि सुखी संसाराची काय काय स्वप्न बघितली होती तिने. आत्ता फक्त सगळ्या स्वप्नांचा चुराडा झालेला दिसत होता. आलेल्या उद्विग्नतेने आणि हतबल परिस्थितीमुळे नकळत तिच्या तोंडून हुंदका फुटला. अशीच स्फुंदत तिने सोफ्यावर मान टाकली आणि तिचा डोळा लागला.

किती वेळ गेला माहीत नव्हते पण कसल्याशा आवाजाने तिला जाग आली. परिस्थितीचे भान आल्यावर तिला जाणवले की आजूबाजूला अंधार झाला आहे आणि डोअर बेलचा आवाज येत आहे. ताडकन उठून तिने हातानेच केस नीट केले, चेहेरा आणि डोळे पुसले आणि आयहोल मधून बघितले.

बाहेर असीम उभा होता आणि खिशातून घरच्या चाव्या काढायचा प्रयत्न करत होता. तिने पटकन दार उघडले.

बाहेर उभ्या असलेल्या असीमच्या कपाळावर स्पष्ट आठ्या होत्या. एका हातात पिझ्झा बॉक्सेस धरून आणि खांद्यावरील लॅपटॉप बॅग सांभाळत तो कसाबसा चाव्या काढायचा प्रयत्न करत होता. दार उघडताच आत येऊन त्याने पिझ्झा बॉक्सेस तिच्या हातात दिले आणि बूट काढून तो सरळ आत निघून गेला. तिला काहीही विचारायचे कष्टही घ्यावेसे वाटले नाहीत त्याला. दिवसभराच्या एकांतानंतर तिला कुणाशीतरी आसुसून बोलावेसे वाटत होते. तशात असीमचे हे इग्नोर करणे तिच्या जिव्हारी लागले आणि त्याचा भयंकर संताप आला. त्याच्याशी कचाकचा भांडावेसे वाटायला लागले. संतापाने ती थरथरायला लागली. हातातून बॉक्स खाली पडू नये म्हणून पटकन आत येऊन तिने टेबलावर ठेवले.

काय बोलावे आणि कसे भांडावे ह्याचा विचार पूर्ण व्हायच्या आत फ्रेश होऊन असीम खाली आला. तिच्याकडे लक्षं ही न देता त्याने पटकन दोन प्लेट्स काढल्या, एक तिच्या समोर ठेवली आणि दुसऱ्या प्लेट मध्ये दोन्ही बॉक्स मधील पिझ्झा स्लाईसेस घेऊन मायक्रोव्हेव मध्ये गरम करायला ठेवल्या. तेवढ्या वेळात फ्रीज मधून कोकाकोलाचे टीन्स काढून घेतले. सगळा जामानिमा घेऊन तो टीव्ही समोर जाऊन बसला. टीव्हीवर त्याने बेसबॉलची मॅच लावली आणि पिझ्झ्याबरोबर तो मस्तपैकी मॅच एंजॉय करायला लागला. तिच्यासाठी आठवणीने प्लेट काढली असली तरी तिला साधे 'घे' म्हणायचे कष्टही त्याने घेतले नाहीत.

ह्या दुर्लक्षीतपणामुळे अपमानीत झालेल्या आभाच्या डोळ्यात टचकन पाणी आले. आयुष्यात पहिल्यांदाच तिला इतके अगतिक असहाय्य वाटू लागले. पिझ्याच्या प्लेटकडे दुर्लक्ष करून ती सरळ बेडरुममध्ये गेली आणि उशीत तोंड खुपसून तिने आपल्या भावना अश्रुवाटे मोकळ्या होऊ दिल्या. रडता रडता अशीच कधीतरी तिला झोप लागून गेली.

खूप उशिरा रात्री किंवा पहाटे कधीतरी भुकेने तिला जाग आली. भानावर यायला आणि परिस्थितीची जाणीव व्हायला तिला काही क्षण लागले. तिने वळून पाहिले तर बाजूला असीम शांतपणे झोपला होता. त्याच्या मंद घोरण्यावरून त्याच्या शांत झोपेची जाणीव होत होती. त्याची झोप डिस्टर्ब होणार नाही ह्याची काळजी घेत ती अलगद उतरली आणि हळुवार हालचाली करत ती खाली आली. खाली किचनमध्ये सगळं नीट आवरले होते. तिची रिकामी प्लेट बाजूला ठेवली होती. उरलेले पिझ्झे फ्रिजमधे ठेवले होते. ओटा टेबल सगळं नीट स्वच्छ होतं. तिने पटकन पिझ्झ्याचे 2-3 पीस प्लेट मध्ये घेतले आणि मायक्रोव्हेव मध्ये गरम केले. आधाशासारखे 2 पीस खाऊन पोटातील आग शांत झाल्यावर तिचे डोके थोडे काम करायला लागले.

हे लग्न दोघांच्याही मर्जीविरुद्ध झाले होते, पण लग्न झाल्यानंतर आता ते इथे अमेरिकेत होते ही सत्य परिस्थिती होती. असीम तसाही एकटा रहात होता, तेव्हा त्याचे तिच्यावाचून काहीच अडणार नव्हते. पण तिची परिस्थिती वेगळी होती. तिची स्वतःची मतं काहीही असली तरी ती आत्ता सर्वस्वी असीमवर अवलंबून होती, ही वस्तुस्थिती तिला स्वीकारणे भाग होते. मग जर परिस्थिती बदलता येत नसेल तर आहे त्या परिस्थितीला कसे सामोरे जायचे ह्या दृष्टीने तिचे विचार सुरू झाले.

तसेही आता सकाळ व्हायला आलीच होती, तेव्हा परत झोपायचे विचार रद्द करून तिने आवरायला घेतले. स्वतःचे पटापट आवरून तिने एकीकडे चहा टाकला आणि किचनमध्ये काय काय आहे ते शोधायला लागली. तिला उपयोगी असे फक्त अंडी आणि ब्रेड मिळाले. किचनसाठी लागणाऱ्या सामानाची मनातल्या मनात यादी करताना तिने एकीकडे अंडी उकडायला ठेवली. असीम जेव्हा उठून खाली आला तेव्हा चहाच्या सुवासाने चकित झाला. आभा चक्क हसऱ्या चेहेऱ्याने त्याला सामोरी गेली आणि तिनेच संवाद सुरू केला.

"गुड मॉर्निंग. घरात आलं नव्हतं म्हणून थोडी वेलची घालून चहा केला आहे, आणि नाश्त्याला एग सँडविच बनवले आहे. घरात अजून काहीच नव्हते."

आभाचं ते हसरं रूप बघून आणि तिचे बोलणे ऐकून तो जरा गोंधळून गेला. त्याच मनस्थितीत तोही संवादात सामील झाला.

"गुड मॉर्निंग. मी सकाळी कॉफी घेतो आणि ब्रेकफास्टसाठी बेगल्स ठेवले आहेत आणून."

"कॉफी का? चहा नाही आवडत?" तिने आश्चर्याने विचारले.

"आवडतो पण सकाळी करायला वेळ नसतो आणि इन्स्टंट कॉफी बनवायला एकदम सोप्पी." त्याने त्याचा बॅचलर पॉइंट ऑफ व्ह्यू सांगितला.

"आधीचे जाऊ दे. आता मी आहे... मी करेन" तिने अधिकाराने संगितले. तिचा तो अधिकार त्याला कुठेतरी आवडून गेला. "बरं, आपल्याकडे पिन कन्व्हर्टर आहे का? माझा लॅपटॉप चार्ज करायचा आहे. आणि इथे कुठे जवळपास बाजार आहे का? मला जरा काही गोष्टी आणायच्या आहेत." ती पुढे बोलती झाली.

"ठीक आहे, तयार हो. मी ऑफिसला जाताना सोडतो तुला. लॅपटॉपसाठी नवा चार्जर घे, म्हणजे प्रत्येकवेळी पिन कन्व्हर्टरची गरज नाही पडणार."

चहा नाश्ता झाल्यावर ते दोघेही पटकन तयार झाले आणि असीमने तिला एका मॉलमध्ये सोडले. गाडीतून उतरून त्याने तिला समजावून संगितले "हे बघ, हे वॉलमार्ट, हे आत्ता उघडे असेल. ते समोर

बेस्ट बाय आहे, ते थोड्या वेळाने उघडेल. तिथे कोपऱ्यावर ग्रोसरी स्टोअर आहे. हे माझे क्रेडिट कार्ड ठेव बरोबर. सगळं शॉपिंग झाले की उबर बोलावून घे. आपला ॲड्रेस मी तुला टेक्स्ट केलेला आहे. काही लागलेच तर मला कॉल कर." सगळं छानसे समजावून असीम निघून गेला.

असीमबद्दल आपण खूप चुकीचा विचार करत होतो हे आभाच्या थोडे थोडे लक्षात यायला लागले. होते. तिने मग मन लावून विचारपूर्वक शॉपिंग केले आणि उबर घेऊन ती व्यवस्थित घरी आली. घरी आल्यावर तिने सगळे सामान छानसे जागेवर लावले आणि समाधानाने ती जरा विसावली. पहाटे लवकर उठणे, नंतर पोटभर ब्रेकफास्ट आणि त्या नंतर भरपूर चालणे झाल्याने तिला बसल्या जागी डुलकी लागली.

जाग आली तेव्हा दुपार उलटून गेली होती. आता इतक्या उशिरा लंच करण्या ऐवजी तिने डिनरची तयारी करण्याचा निर्णय घेतला. घरी ह्या लाडक्या लेकीला स्वयंपाकाची सवय नसल्याने तिने पद्धतशिरपणे यूट्यूबचा आधार घेतला आणि ती झपाट्याने कामाला लागली. भरपूर खपून आणि किचनमध्ये घाम गाळून तिने व्यवस्थित भाजी, पोळी, कोशिंबीर, भात, आमटी असा साग्रसंगीत स्वयंपाक केला. बाहेर टेबलावर सगळे नीटपणे मांडून ठेवले. आपल्या मेहनतीवर एक प्रेमाची नजर फिरवून ती तयार व्हायला गेली. जरा फ्रेश होऊन आणि कपडे बदलून हलकासा मेकअप करून ती असीमची वाट बघत लॅपटॉपवर टाइमपास करायला लागली.

किती वेळ गेला तिच्या लक्षातच नाही आले. बेल वाजली तेव्हा दरवाजा उघडायला जातांना तिचे घड्याळात लक्ष गेले आणि ती चमकली. आज असीमला खूप जास्त लेट झाला होता. आश्चर्य वाटत तिने दरवाजा उघडला. असीम हातात सँडविचचा बॉक्स धरून उभा होता. आत येऊन त्याने बॉक्स तिच्या हातात दिला. "ऑफिसमधल्या कलीग बरोबर हॅप्पी आवरला माझे खाणे झाले आहे. हे तुझ्यासाठी आणले आहे", इतके बोलून असीम शांतपणे फ्रेश व्हायला निघून गेला. हातातल्या त्या बॉक्सकडे हक्काबक्का होऊन ती बघत बसली. मी घरी इतकी खपून सगळा स्वयंपाक बनवते आणि हा शांतपणे बाहेरून जेवून येतो? त्याला साधं बाहेर जातो आहे हे फोन करून सांगता आले नाही?

आभा इतकी सुन्न झाली की असीम फ्रेश होऊन खाली आला तरी ती तशीच हातातल्या बॉक्सकडे बघत तिथेच उभी होती. त्याची चाहूल लागताच तिची तंद्री भंगली. झालेल्या अपेक्षाभंगाने, एक प्रकारच्या अपमानाने तिच्या डोळ्यात टचकन पाणी आले. तिरमिरीत हातातील बॉक्स टेबलावर ठेवून आणि आपला हुंदका असीमपासून लपवत ती धावत बेडरूममध्ये आली आणि तिच्या रडण्याचा बांध फुटला.

कसलीच काही कल्पना नसणाऱ्या असीमला जाणवले की काहीतरी गडबड आहे आणि बहुदा आभा रडत आहे. काय झाले असावे ह्याचा विचार करता करता त्याचे लक्ष टेबलवर नीटपणे मांडून

ठेवलेल्या भांड्यांकडे गेले. त्याने भांड्यांची झाकणे दूर करून बघितले आणि सगळा प्रकार त्याच्या लक्षात आला. आपल्याकडून काय आणि किती मोठी चूक झाली ते त्याच्या लक्षात आले. पण आता काय करावे हे मात्र त्याला सुचत नव्हते. तिच्या पाठोपाठ तो बेडरूममध्ये गेला. तिथे तिला रडताना बघून, आणि तेही त्याच्या अविचारी वागण्यामुळे झाले असल्याने त्याला अतिशय वाईट वाटले.

"आभा" त्याने चाचरत हाक मारली. त्याचा आवाज ऐकून आभा जरा सावरून बसली आणि तिने आपले रडणे थोडे आवरते घेतले. पण तरीही तिचे हुंदके ती संपूर्ण थांबवू नाही शकली. तिला आपली चाहूल लागली आहे हे लक्षात आल्यावर असीम पुढे बोलायला लागला.

"सॉरी आभा, मनापासून सॉरी. मला आत्ता माझी चूक कळली. पण खरच सांगतो, मी मुद्दाम काही नाही केले. नोकरी लागून ह्या घरात आल्यापासून माझे हेच शेड्यूल असते ग. सकाळी कॉफी, दुपारी बाहेर, आणि संध्याकाळी येताना कुणी कंपनी असेल तर हॅप्पी आवरला काहीतरी खाऊन घ्यायचे किंवा मग पिझ्झा किंवा सँडविच असे काहीतरी बाहेरून येताना घेऊन यायचे. आधी मित्रांबरोबर राहायचो तेव्हा पण टी टी एम एम होते – तुझे तू माझे मी. त्यामुळे हे असं घरी स्वयंपाक वगैरे सवयच नाही आणि त्यामुळे लक्षात पण नाही आले माझ्या."

त्याचे इतके मनापासून बोलणे तिला कुठेतरी भावले. तिचे हुंदके अलगद थांबले आणि ती त्याचे बोलणे ऐकू लागली. "म्हणूनच मी म्हणत होतो की मी लग्नाला तयार नाही आहे. माझ्या शिवाय ह्या घरात दुसरे कुणी असण्याची मला खरच सवय नाही. लग्नासाठी लागणारी मानसिक तयारी करायला मला या अचानक झालेल्या लग्नामुळे वेळच मिळाला नाही. आज पण एकाने निघताना विचारले की चलतो का हॅप्पी आवरला तर मी एकदाही विचार न करता हो म्हणून टाकले. तिथे आम्ही खायला ऑर्डर केले तेव्हा मला आठवले की तू घरी आहेस, म्हणून मग निघताना तुझ्यासाठी एक सँडविच घेऊन आलो. मला नव्हते वाटले की तू काही केले असशील... ही कन्सेप्ट माझ्या मनात आलीच नाही. मला वाटते ही आपली मिस मॅच लग्नगाठ आहे, जी आपल्या दोघांच्या मर्जीविरुद्ध बांधली आहे."

त्याच्या बोलण्यातील सच्चाई तिला जाणवली आणि आजच्या प्रसंगात त्याने मुद्दाम काही केले नाही हे ही तिला पटले. त्याच्या बोलण्यातील शेवटी आलेला 'मिस मॅच' हा शब्द मात्र तिला खटकला. जरी दोघेही रेडी नव्हते तरी आता लग्न झाले आहे आणि त्याने त्याच्याबरोबरीने तिलाही मिस मॅच म्हंटले होते.

आभा आता शांत झाली होती. तिचे हुंदके थांबले होते. ते बघून त्याने मित्रत्वाने तिचा हात हातात घेतला आणि परत एकदा तिला सॉरी म्हणायला हळुवारपणे दाबला. त्याचे मित्रत्वाचे मनापासून म्हंटलेले सॉरी तिच्यापर्यंत पोहोचले. अलगदपणे ते तिच्या ओठांवर फुलले आणि असीमने एक निश्वास टाकला.

त्याच्या मनावर आलेले टेंशन आणि मनात आलेली अपराधी भावना त्या छोट्याशा हास्याने दूर केली. तो विषय बदलण्यासाठी एका मित्रासारखे त्याने तिला सांगितले "चल, तू पहिले जरा फ्रेश हो आणि खाली ये. अशी रडणारी मुलगी आवडत नाही मला" म्हणत त्याने हलकीशी टपली मारली आणि हसत तो खाली निघून गेला. त्याचे ते स्पेल तोडण्याचे कसब आणि मित्रत्वाने मारलेली टपली तिला थेट कॉलेजच्या दिवसात घेऊन गेली आणि उत्साहाने ती तोंड धुवायला गेली.

ती फ्रेश होऊन खाली आली तेव्हा असीमने सँडविच एका प्लेटमध्ये गरम करून ठेवले होते. त्याच्या बरोबर फ्राइज आणि कोक ठेवले होते. फ्राइज बरोबर चक्क टोमॅटो केचप पण ठेवलेले बघून तिला कौतुक वाटले. पण तिने सगळा स्वयंपाक केलेला असुनसुद्धा त्याने स्वतः आणलेले सँडविच ठेवलेले बघून तिच्या कपाळावर किंचित आठ्या आल्याच. जणू काही त्याच वाचून असीम बोलला.

"हे बघ, आज ह्या घरात पहिल्यांदा असा संपूर्ण स्वयंपाक झाला आहे. तुझ्या पाककौशल्याबद्दल शंका घ्यायला मला काही कारण दिसत नाही. आणि तू हा स्वयंपाक इतकं खपून आपल्या दोघांसाठी केला आहेस, तर मग आपण दोघेही एकदम जेवू. हे मी आत्ता नीट झाकून फ्रीजमध्ये ठेवतो, उद्या लंच करू आपण मस्त. तसेही हे सँडविच आत्ता ठेवले तर उद्या तो ब्रेड वातड होईल. त्यापेक्षा आता बस आणि घे खाऊन."

आभा त्याच्या इतक्या डिटेल मध्ये दिलेल्या स्पष्टीकरणाने खुश झाली. त्यात त्याने तिच्याबद्दल केलेला विचार दिसत होता, तिच्या श्रमाबद्दल आदर दिसत होता, तसेच तिच्या कष्टाला दिलेला मान दिसत होता. त्याच्या बोलण्याचा विचार करत ती खुर्चीवर बसली आणि अचानक त्याच्या 'लंच' शब्दावर अडखळली. "लंच?" तिने प्रश्नार्थक विचारले. खुर्चीवर तिच्यासमोर बसताना तो बोलला "हो, लंच. उद्या दांडी" छानसे हसत जीभ बाहेर काढून आणि डोळा मारत तो बोलला. त्याच्या त्या अभिनयाने तिला हसू आले. खाता खाता ती बोलली, "काय एकदम प्रायश्चित्त वगैरे की काय?" आणि तिला खळाळून हसायला आले.

असीम खरतर आभाला आज पहिल्यांदाच इतक्या जवळून नीट बघत होता. आत्ता हसताना तिचे मनमोहक विभ्रम त्याला आवडून गेले. तिने साधा फिकट निळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस घातला होता आणि खांद्यावर व्यवस्थित मॅचिंग ओढणी होती. केस फक्त मागे एका हेअरबॅंड मध्ये बांधले होते. एक चुकार बट मधेच सुटून तिच्या कपाळावर रूळत होती. चेहेऱ्यावर अजिबात मेकअप नव्हता पण तरीही गोरा गोलाकार चेहेरा खूप रेखीव दिसत होता. कानात एक नाजुक लोंबते घातले होते, ते सुद्धा मॅचिंग होते. आभाने टिचकी वाजवून त्याला भानावर आणेस्तोवर असीम तिलाच नीट बघत होता आणि त्याला ती अजून अजून आवडत होती. ह्याच मुलीशी मी इतके दिवस धड बोललो पण नाही ह्याचेच त्याला आता आश्चर्य आणि वाईट वाटायला लागले. भानावर आल्यावर हसून त्याने बोलायला सुरुवात केली,

“अगं, अगदी प्रायश्चित्त वगैरे नाही. तसेही मी आजपर्यंत एकपण सुट्टी नाही घेतली. कधी काही कारणच नव्हते. तेव्हा सुट्ट्या पडल्या आहेत. तुला इथे जवळपासचा परिसरपण दाखवला नाही अजून. तर उद्या जरा आरामात उठू, इथे जवळपासचे मॉल वगैरे दाखवतो तुला. मग घरी येऊन लंच करू. दुपार नंतर परत बाहेर पडू आणि इथे काही ठिकाणं आहेत बघण्यासारखी तिथे जाऊ. येताना बाहेरूनच डिनर करून येऊ.” असीमने उद्याचा प्लॅन सांगून टाकला. तो हे सगळे मघाशी झालेल्या प्रसंगामुळे करतो आहे हे आभाला कळत होते. पण काही का असेना, उद्याचा दिवस छान जाणार म्हणून ती खुश झाली.

तिचे खाणे झाल्यावर त्यांनी गप्पा मारत उद्याचे प्लॅनिंग करत सगळे जेवण नीट फ्रीजमध्ये ठेऊन सगळे आवरून घेतले. आभाची ह्या घरातील, किचनमधील हक्काने चाललेली लगबग असीम कौतुकाने बघत होता. इतक्या पटकन तिने कुठे काय ठेवले आहे ते व्यवस्थित जाणून घेतले होते. आज आणलेले इतर सामानही व्यवस्थित लावून ठेवलेले दिसत होते. इतकी गोड मुलगी आपल्या इतक्या जवळ असताना आपल्याला काहीच कसे जाणवले नाही, ह्या विचारानेच त्याला स्वतःचा राग येत होता.

त्यामुळे एक वेगळीच अनामिक हुरहूर तिच्या जीवाला लागली होती. ही संपूर्णपणे नवी भावना तिला आवडू लागली होती आणि त्याचाच परिणाम म्हणजे एक गोड गुलाबी लाली तिच्या गालावर आली होती. एकूण संध्याकाळपासून घडलेल्या प्रसंगांनी दोघेही एकमेकांबद्दलचे आपले विचार परत तपासून बघत होते. आभाही विचार करत होती की कधीकाळी जर आपण आपल्या जोडीदाराचा विचार केला असता, तर तो असीमपेक्षा काय वेगळा असता? दिसायला बऱ्यापैकी हँडसम आहे, अमेरिकेत एक मस्त नोकरी आहे, राहायला स्वतःची जागा आहे, गाडी आहे आणि इथे राहून सुद्धा सगळ्या महाराष्ट्रियन वॅल्यूज आहेत. और क्या चाहीये?

असीमला थोडे ऑफिसचे काम होते. तेव्हा तो लॅपटॉप उघडून कामाला लागला. आभाने सगळे आवरून झाल्यावर एका छानशा मूडमध्ये दुसऱ्या दिवशीची तयारी करून ठेवली. एका वेगळ्याच खुशीत उद्याचे स्वप्न रंगवत ती असीमची वाट बघत पडली आणि तिचा डोळा लागून गेला. काम संपवून असीम आला तेव्हा आभा शांतपणे झोपली होती. तिच्या त्या सुंदर निरागस चेहऱ्याकडे बघतच तो तिच्या बाजूला पहुडला. तिच्याबद्दल आणि उद्याबद्दल विचार करत त्याचाही डोळा लागला.

दुसऱ्या दिवशी सकाळी तयार होऊन असीम खाली आला, तर आभा संपूर्ण तयार होऊन किचनमध्ये काम करत होती. सगळीकडे चहाचा सुवास दरवळत होता. त्याच बरोबर छान कांदेपोहे तयार होते. असीमने आभाकडे बघितले आणि त्याच्या ओठातून शिट्टी निघता निघता राहिली. आभाने एक साधासा पण सुंदर हलक्या पिवळ्या रंगाचा पंजाबी घातला होता. त्यावर मॅचिंग ओढणी. कानात लहानसे पिवळे टॉप्स. एका हातात मॅचिंग पिवळ्या बांगड्या तर दुसऱ्या हातात एक नाजुक घड्याळ, ते

ही पट्ट्याच्या जागी चेन असलेले. आभा त्याच्याकडे वळली तेव्हा त्याला तिची टिकली दिसली. कपाळावर पिवळी टिकली कदाचित दिसणार नाही हे लक्षात ठेऊन तिने एक लाल टिकली लावली होती आणि मग त्यावर त्यातल्या आतल्या आकाराची पिवळी टिकली लावली होती. त्यामुळे त्या पिवळ्या टिकलीला सुंदर लाल माहीरप दिसत होती आणि त्या लाल रंगामुळे पिवळी टिकली खूपच मोहक दिसत होती. ओठांवर अगदी फिक्कट लिपस्टिक होते. आणि ह्या सगळ्या जामानिम्याची शोभा कित्येक पटीने वाढवणारे स्मितहास्य तिच्या रंगीत ओठांवर विलसत होते. असीमसाठी आत्ता 'ती पाहताच बाला, कलिजा खलास झाला' असा मामला झाला होता. त्याच्या नजरेतील कौतुक टिपून आभामधली स्त्री सुखावली.

"वॉव, तुला मॅचिंगची खूप आवड आहे वाटते" असीमने नजरेने कौतुक करत तिचा साजश्रृंगार टिपल्याचे दाखवले. "जस्ट एक सांगतो, तू ह्या पेहेरावात खूप सुंदर दिसते आहेस, पण तू इथे पंजाबी ड्रेसेसच घातले पाहिजेत असे काही नाही... तू ठरव आणि तुला हवे ते घालू शकतेस. स्कर्ट टॉप, जीन्स टीशर्ट्स – तुला हवे ते... मला काहीही प्रॉब्लेम नाही."

"नाही, मलाच आवडतात पंजाबी ड्रेसेस वगैरे. मी घालते इतर कपडे पण ते क्वचित occasion प्रमाणे. इतर वेळेस हेच ड्रेस छान सुटसुटीत वाटतात मला" त्याने केलेल्या कौतुकाने झालेला आनंद चेहेऱ्यावर दाखवत तिने त्याला संगितले. "पण तू का असा फॉर्मल ड्रेस घातला आहेस? आपण तुझ्या ऑफिसलापण जाणार आहोत का? तू तर सुट्टी टाकणार म्हणाला होतास ना?" त्याच्या कपड्यांबद्दल तिने तिचे मत दिले.

"ओह, राइट. माझ्या लक्षातच नाही आले. नेहेमी मी हेच कपडे घालतो. थांब, आलोच चेंज करून" म्हणत तो पटकन पळाला. आभाने मग चहा पोहे वाढून घेतले आणि त्याची वाट बघत बसली. असीम लगेच आला. त्याने मस्त 'You are looking at a Genius' असं लिहिलेला एक लाल टीशर्ट आणि काळी शॉर्ट्स घातली होती. त्या वेषात तो अजून गोरा आणि छान हँडसम दिसत होता. तिच्या कॉमेंटची वाट बघणाऱ्या असीमला हाताने छानची खूण करत तिने संगितले "वा, हा मस्त आहे. फक्त आता आपण बाहेर पडू तर लोकांना हळद कुंकू आले असे वाटेल" म्हणत ती खुसखुसून हसायला लागली. त्यालाही ते लक्षात आले आणि त्यालाही हसू आले.

दोघांनी मग नाश्ता करायला घेतला. पोहयांचा पहिला घास खाल्ला आणि त्याच्या चेहेऱ्यावर समाधान पसरले. चहाचा एक सिप घेऊन त्याने तिला सांगीतले, "पसंत आहे मुलगी". तिच्या चेहेऱ्यावरचे आश्चर्य वाचून तोच पुढे म्हणाला, "अगं आपला मुलगी बघण्याचा चांगला कार्यक्रम झालाच नव्हता ना. आत्ता छान चहा पोहे झालेच आहेत, तर हाच तो कार्यक्रम आहे असं समजू". त्याच्या चेहेऱ्यावरील

मिस्किल भाव बघून आभा चक्क लाजली. काही न बोलता ती खाली मान घालून खात राहिली. तिथे निर्माण झालेले ते वातावरण एंजॉय करत असीम देखील छान चहा पोहे खायला लागला.

नाश्ता उरकून दोघेही लगेच बाहेर पडले. असीमने मग तिला Sam's club, Walmart, Costco वगैरे भटकवले. इतकी मोठ्ठी दुकाने बघून आभा एकदम दबून गेली. भिरभिरत्या नजरेने ती सगळीकडे बघत होती. असीम तिला धावती कॉमेंट्री देत होता. कालच खरतर ती Walmart ला येऊन गेली होती, पण आत्ता असीमच्या माहितीने तिला तीच जागा अजून चांगल्या प्रकारे अनुभवता येत होती. सगळीकडे फिरताना कळत नकळत त्यांचा एकमेकांना स्पर्श होत होता. दोघेही काही झालेच नाही किंवा कळलेच नाही असे दाखवत होणारे चोरटे स्पर्श एंजॉय करत होते. त्या स्पर्शाने त्यांच्या फिरण्याला एक रोमॅनटीक फील यायला लागला. तिन्ही दुकाने मनसोक्त फिरून दोघांचाही नाश्ता पुरता जिरला आणि दोघेही दमले. मग एकमताने त्यांनी जेवायला घरी जायचे ठरवले.

घरी येऊन त्यांनी लगेच जेवण काढले आणि तिने लगेच गरम करायला ठेवले. त्याने एकीकडे डिश, ग्लास वगैरे घेतले. जेवायला बसल्यावर त्याने पहिला घास घेतला आणि त्याच्या तोंडून "वाह" असा कौतुकोद्गार निघाला. त्याला भाजी भयंकर आवडली. नंतर कोशिंबीर, आमटी, एक एक करत त्याने सगळे टेस्ट केले आणि तो खरच खुश झाला. "काय मस्त चव आहे ग तुझ्या हाताला. सगळेच खूप छान झाले आहे. तू नेहेमी स्वयंपाक करायची का माहेरी? आवड आहे तुला स्वयंपाकाची?" तिचे कौतुक करत त्याने विचारले.

"नाही रे, मला आवड आहे स्वयंपाकाची पण कधी केला नाही. आई एकतर करू द्यायची नाही आणि तेव्हा मित्र मैत्रिणींबरोबर इतके काही चालू असायचे की स्वयंपाकघरात जायची वेळच नाही यायची" त्याच्या कौतुकाने खुष झालेल्या तिने त्याला उत्तर दिले.

"अरे वा, मग एक काम करू आपण. तसेही H4 वर असल्याने EAD मिळेपर्यंत तुला नोकरी करता येणार नाही. मग तोपर्यंत नुसती घरी बसण्याऐवजी तुला हवे असेल तर तू स्वयंपाकाच्या ऑर्डर घेशील? माझ्यासारखे इथे खूप बॅचलर आहेत"... बोलून गेला आणि त्याने जीभ चावली. "नाही, म्हणजे आता मी बॅचलर नाही, पण जसा मी बॅचलर होतो, तसे खूप आहेत इथे. त्यांना जर इतके सुग्रास जेवण मिळणार असेल तर उड्या पडतील त्यांच्या. बघ, कर विचार. मी सांगेन माझ्या ऑफिसमध्ये आणि घेऊन पण जाईन डब्बे." त्याने प्रस्ताव मांडला. त्याचा तो प्रस्ताव ऐकून ती हरकून गेली. तिने लगेच त्याला रुकार देऊन टाकला. त्याने जेवताना मोबाइल काढला आणि लगेच त्याच्या ऑफिसच्या 'देसी' ग्रुपवर मेसेज पण टाकून दिला. त्याचा मेसेज वाचून तिने आश्चर्याने विचारले "दोन आठवड्यांनंतरची तारीख का टाकलीस रे?" चेहेऱ्यावर एक चावट हसू बाळगत तो बोलला "आत्ताच तर आपण खऱ्या अर्थाने एकमेकांना ओळखायला लागलो आहोत. मला नाही वाटत कमीतकमी दोन आठवडे तरी तुला

स्वयंपाकाला वेळ मिळेल" आणि त्याने डोळा मारला. पहिले तिला काहीच कळले नाही, पण त्याच्या चेहेऱ्यावरील ते वेगळेच भाव आणि त्याचे डोळा मारणे बघून तिने त्याचे वाक्य परत एकदा आठवले. त्याच्या बोलण्यातील गर्भितार्थ लक्षात आल्यावर ती झक्कास लाजली.

"ओहो, पण आपली लग्नगाठ तर मिस मॅच आहे ना?" एक भुवई उडवत तिने त्याला विचारले. आपलेच बोलणे आपल्यावर अशा क्षणी उलटलेले बघून तो खजील झाला आणि त्याचा चेहेरा पडला. त्याच्या चेहऱ्याकडे बघताना तिला हसू यायला लागले आणि ती खुसखुसायला लागली. तिच्या त्या हसण्याच्या आवाजाने तो अजूनच खजील झाला, पण मग त्यालाही थोडे हसायला यायला लागले. असेच हसतखेळत त्यांचे जेवण आटोपले. जेवण झाल्यावर तिने पटापट आवरून किचन चकाचक करून टाकले. पोट खूप भरले असल्याने मग दोघांनी तास दोन तास गप्पा मारत टीव्हीवर वेब सिरिज वगैरे सर्फ केल्या. उन्हं थोडी उतरल्यावर ते रेडी व्हायला गेले. असीम फक्त फ्रेश होऊन आला आणि आभाची वाट बघत बसला.

१५ - २० मिनिटात आभा आली आणि तिला बघून सकाळी प्रयत्नपूर्वक टाळलेली शिट्टी त्याच्या ओठतून बाहेर पडलीच. आभाने त्याला मॅचिंग असा लाल स्लीवलेस टॉप घातला होता. ओठावर तशाच लाल रंगाची लिपस्टिक होती. कानातले टॉप्स आणि डोक्याला लावलेला हेअरबॅंड सुद्धा लाल होता. खाली तिने मस्त जीन्सचा काळा शॉर्ट स्कर्ट घातला होता. "Wow, you are truly looking gorgeous" मनातील भावना व्यक्त करण्यासाठी त्याला इंग्लिशचा आधार घ्यावा लागला. "खरच, खूपच सुंदर दिसते आहेस तू ह्या वेस्टर्न आऊटफीट मध्ये सुद्धा. आणि तुझे मॅचिंग तर जबरदस्त आहेच, पण तू आपले पण लाल काळे मॅचिंग केलेस. मानलं तुला." त्याच्या ह्या स्तुतीने तिला प्रचंड आनंद झाला आणि त्याचे कौतुक छानसे स्वीकारत तिने लाजून मान खाली घातली.

तिच्या ह्या रूपाकडे बघून असीमच्या मनात प्रचंड खळबळ सुरू झाली. त्याची ती हक्काची बायको होती आणि त्याच्यासमोर ती इतक्या सुंदर रूपात उभी होती. पुढे होऊन किमान तिला कवेत घ्यावी अशी उर्मी त्याला होत होती. त्याप्रमाणे त्याने काही कृती करायच्या आधीच आभा वळली आणि "चल, निघूया" असे म्हणत ती पर्स घ्यायला गेली आणि तो स्पेल तुटला. आलेली उर्मी तशीच दाबून तो सुद्धा वळला आणि पाकीट, गाडीची चावी वगैरे घ्यायला लागला.

मग उरलेली संध्याकाळ त्यांनी भटकण्यात आणि जवळपासची स्थळं बघण्यात घालवली. सकाळच्या फिरण्यात आणि आत्ताच्या फिरण्यात एक महत्वाचा फरक म्हणजे गाडीतून उतरल्यावर फिरायला जाताना असीमने हक्काने आभाचा हात हातात घेतला. पहिले एक क्षण तिला संकोच वाटला. पण ज्याप्रकारे आज असीम तिच्याकडे बघत आणि बोलत होता, त्या पार्श्वभूमीवर त्याची ती धिटाई तिला आवडून गेली. असीमने मघाचची थोडक्यात हुकलेली संधी लक्षात ठेवून धाडस केले होते आणि

तिने हात सोडवून न घेतल्याने त्याला प्रचंड आनंद झाला. सगळ्यात मुख्य म्हणजे दोघांचेही मित्र मैत्रीण असले तरी आजपर्यंत दोघांचेही एकही सीरियस अफेयर झाले नव्हते. त्यामुळे हे असे प्रेमात पडणे हे दोघांनाही खूप नवीन होते. त्याची गोडी, ती हृदयातील धडधड, तो स्पर्शातील रोमांच, हे सगळेच त्यांना नवीन होते आणि दोघेही ते खूप एंजॉय करत होते. फिरताना जेव्हा समोरून येणारे पुरुष आभाला न्याहाळायचे तेव्हा असीमला कुठेतरी एक अभिमान आणि त्याच वेळी कुठेतरी जलन अशा विचित्र भावना निर्माण व्हायला लागल्या. अगदी तसेच समोरून येणाऱ्या मुली जेव्हा असीमकडे बघत आपापसात कॉमेंट्स करायच्या तेव्हा आभाला अभिमान पण वाटायचा पण मग आपसूक तिची त्याच्या हातवरील पकड अधिकच घट्ट व्हायची.

फिरून झाल्यावर, अंधार पडल्यावर असीम तिला एका छानशा स्पोर्ट्स बार मध्ये घेऊन गेला. तिथले ते वेगळे वातावरण, ते सगळीकडे लावलेले टीव्ही स्क्रीन्स, तो गोलाकार बार, बारला लागूनच बसायला उंच स्टूल, त्या तोकड्या कपड्यातील वेट्रेस वगैरे ती नवलाईनी बघायला लागली आणि असीम तिचे ते एंजॉय करणे एंजॉय करायला लागला. असीमने एक कोपऱ्यातील टेबल निवडले आणि दोघे समोरासमोर बसले. असीमने तिला विचारले की तिला काही ड्रिंक घ्यायला आवडेल का. आभाने सांगीतले की कॉलेजमध्ये असताना एकदाच तिने रेड वाईन घेतली होती आणि तिला चव आवडली होती. असीमने मग स्वतःसाठी एक पेग व्हिस्की आणि तिच्यासाठी रेड वाईन ग्लास मागवला. त्याच बरोबर तिथली स्पेशलिटी असलेले विंग्ज आणि फ्राइज मागवले. ऑर्डर येईपर्यंत ते दोघे गप्पा मारत होते, पण असीम थेट नजरेने एकटक आभाकडे बघत होता. त्याच्या त्या नजरेने ती थोडी अस्वस्थ झाली पण त्याला काहीही न बोलता ती नजर फिरवून बारचे डिटेल्स टिपत राहिली.

ऑर्डर आल्यावर त्यांनी छानसे चीयर्स केले आणि एक एक सिप घेतला. वाईनची चव आवडल्याचे भाव तिच्या चेहेऱ्यावर बघून त्याला बरे वाटले. एक वेगळाच मसाला टाकलेल्या फ्राईज आणि वेगळ्याच फ्लेवरचे विंग्जसुद्धा तिला आवडून गेले. आणि त्याला अत्यंत आवडायला लागलेल्या मुलीला त्याने ऑर्डर केलेल्या गोष्टी आवडल्या हे बघून असीम खूप खुश झाला. खरं तर आता त्यांनी आपल्याभोवती जे एक नवीन दोघांचेच भावविश्व निर्माण केले होते, त्यात त्यांना प्रत्येक गोष्ट छानच वाटायला लागली होती. डिनर आणि त्याबरोबर अजून एक एक ड्रिंक झाल्यावर त्यांनी एक पिक्चर टाकायचा ठरवला. थिएटरमधील तिचा वावर तिचे नवखेपण दाखवून देत होता. ते छोटेसे तरीही बरेचसे रिकामे थिएटर, त्या आलीशान सिट्स सगळं ती टिपून घेत होती. पिक्चर कुठलातरी लेटेस्ट इंग्लिश होता. आधी बरीचशी ट्रेलर्स झाल्यावर खरा पिक्चर सुरू झाला आणि थिएटरमधले लाईट्स बंद झाले. धाडस करून असीमने आभाचा हात हातात घेतला. तिने कुठलेही ऑब्जेक्शन घेतले नाही, फक्त लाजून एकदा त्याच्याकडे

बघितले आणि परत ती पिक्चर बघायला लागली. पिक्चर दोघेही बघत होते पण तरी दोघांचे संपूर्ण लक्ष हातातल्या त्या स्पर्शाकडे देखील होते.

काही वेळाने असीमने तिचा हात आपल्या डाव्या हातात घेतला आणि उजवा हात तिच्या डोक्यामागुन तिच्या खांद्यावर टाकला. जरी त्याची कृती धाडसाची होती, तरी ह्यावेळी त्याला विश्वास होता की आभा काहीच बोलणार नाही. खांद्यावर त्याचा हाताचा स्पर्श झाल्यावर एक क्षण आभा दचकली, पण मग तिच्या लक्षात आले. तिने एकदा लाजून त्याच्याकडे बघितले आणि परत पुढे बघायला लागली. असीमचा हात आता तिच्या स्लीवलेस टॉपमुळे उघड्या पडलेल्या मुलायम दंडावरून फिरायला लागला. त्याने अलगद जोर लावून आभाला आपल्याकडे खेचले. त्याच्या त्या कृतीने आभा त्याच्याकडे ओढली गेली आणि त्याला अगदी खेटून बसली. तिची ती जवळीक, तिचा तो मुलायम स्पर्श त्याला कासावीस करायला लागला. पुढील पिक्चर मग त्याला कळलाच नाही. एकदम थिएटर मधले लाईट लागले तेव्हा तो भानावर आला. दोघेही सावरून बसले आणि एकमेकांकडे बघून हसले.

तिथून घरापर्यंतच्या प्रवासात दोघे बोलत होते, पण त्या बोलण्यात सहजता नव्हती. त्यांच्या नात्यात झालेल्या नवीन प्रगतीने त्यांच्यात थोडा अवघडलेपणा आला होता. आधी घेतलेल्या दोन दोन ड्रिंक्सची हलकीशी नशा आणि त्यात शारीरिक जवळीकीने आलेली धुंदी ह्यामुळे ते घरी पोहोचले तर माहोल मध्ये एक वेगळीच झिंग होती. दोघे फ्रेश होऊन आणि चेंज करून आले. असीमने घरातील शॉर्ट्स आणि एक सिंपल ढगळ टीशर्ट घातला होता. आभा बेडरूममध्ये आली, तर असीम तिच्याकडे बघतच राहिला. तिने निळ्या रंगाचा फुलाफुलांचा सिल्की गाऊन घातला होता. कापडाच्या सिल्किनेसमुळे तो गाऊन बराचसा तिच्या अंगाला चिटकुन बसला होता. त्यातून तिची फिगर छान दिसत होती आणि दिसणाऱ्या दृष्याने असीम कासावीस होत होता.

"खूप छान गेला ना आजचा दिवस? काय धम्माल केली आपण आज" अजूनही त्याच मूडमधे आणि त्याच धुंदीत असलेली आभा बोलली.

"हो ना... खरच, मलाही आज पहिल्यांदा अशी आणि इतकी मजा आली. माझी ती झिंग अजूनही उतरली नाही आहे" म्हणत त्याने तिच्या बोलण्याला रुकार दिला आणि अजूनही त्याला तेच पुढे सुरू ठेवायचे आहे ह्याची हिंट दिली. दोन पावले पुढे होऊन त्याने तिच्या खांद्यावर दोन्ही हात ठेवले आणि दोन खोल हसऱ्या चंचल पुष्करणी सोबत त्याचा सामना झाला. त्यालाही तिच्या नजरेतील हलकीशी नशा आणि ओढ जाणवली. झालेल्या घटना खूपच विलक्षण होत्या आणि इतक्या जवळून तिला असे पाहून असीम उत्तेजित झाला.

तसेच तिच्या नजरेत नजर मिसळून अंतःकरणाच्या गाभ्यापासुन त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले, “आभा, आय लव्ह यू.” ते शब्द तिच्या कानांनी टिपले, योग्य प्रकारे मेंदूपर्यंत पोहोचवले, मेंदूने त्याचा अर्थ लावायला सुरुवात केली, तिन्ही शब्दांचा आणि त्याने बनलेल्या वाक्याचा अर्थ मेंदूला लागला आणि तिच्या मनात अचानक हजारो फुलपाखरे बागडू लागली. तिच्या चेहेऱ्यावर प्रचंड लाज आणि त्यामुळे आलेली लाली तिचे सौंदर्य कित्येक पटीने वाढवून गेले. त्याच्या आय लव्ह यू चा तिला लगेच रिस्पॉन्स द्यायचा होता पण कुठेतरी त्याचे कालचे उद्विग्न बोलणे तिला आजही आठवत होते.

त्यामुळे चेहेऱ्यावर चक्क आश्चर्याचे भाव आणून तिने अत्यंत मासूमपणे विचारले “म्हणजे?” त्याने बाकी काहीही अपेक्षिले असले तरी हा प्रश्न अपेक्षिला नव्हता. आय लव्ह यू चा रिस्पॉन्स ‘म्हणजे’? सगळा स्पेल तुटला आणि काहीतरी अतिशय महत्वाचे हातातून निसटून चालले आहे असे काहीसे फिलिंग त्याला आले. त्याने पोटतिडकीने तिला संगितले “अगं आभा, आय लव्ह यू... माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे.” चेहेऱ्यावरील तेच आश्चर्य आणि मासूमियत तश्शीच ठेवून तिने विचारले “कधीपासून?”

आधीचा तिचा रिस्पॉन्स खूप धक्कादायक असल्याने ह्यावेळेस त्याला तितका धक्का नाही बसला. तरी जे ऐकायला त्याचे कान आसुसले होते ते न ऐकू आल्याने परत त्याचा हिरमोड झाला. “अगं, कधीपासून काय? आत्तापासून. आज दिवसभरात मी जे तुझ्याबरोबर अनुभवलं आहे आणि त्यामुळे मला जे तुझ्याबद्दल वाटायला लागले आहे तेच सांगतो आहे ना. खरच, आय लव्ह यू आभा” अगदी मनापासून त्याने तिला सांगितले. त्याचे बोलणे ऐकून तिची एक भुवई वर झाली. अगदी शांतपणे तिने विचारले, “तुला माहीत आहे ना तू कुणाला हे बोलतो आहेस?” असीम चक्रावला. त्याला कळेना की ती दारूच्या नशेत बोलते आहे का ती खरच विचारते आहे.

“अगं, असे काय विचारते आहेस? मी तुला बोलतो आहे. माझ्या बायकोला” तिला चुचकारत तो बोलला. “बायको?” तिने नाटकीपणे विचारले “ओहो, बायकोला. पण तिच्याबरोबर बांधलेली लग्नगाठ तर मिस मॅच आहे ना?” तिची खरी मळमळ अखेर बाहेर पडली. तिच्या तोंडून ते शब्द ऐकल्यावर असीमला खरी दुखरी नस आणि आपली चूक कळली. बोलताना काल तो बोलून गेला होता. पण तेव्हाही त्याला तसे शब्दशः म्हणायचे नव्हते आणि आता तर त्याला चक्क त्या बोलण्याचा पस्तावा होत होता. त्यामुळे तिला बोलण्यापासून थांबवण्यासाठी त्याने तिच्या ओठांवर बोट ठेवले आणि बोलला “श्यूऽऽऽ”

“कालपर्यंत मिस मॅच होती ना ही लग्नगाठ” त्याच्या बोटाखालून तिचे ओठ बोलतच होते “मग आता काय झाले? मिस मॅच लग्नगाठीतील ही बायको कशी काय मॅच झाली?” असीमने तिच्या ओठांवरून आपले बोट काढले आणि आपल्या ओठांनी तिचे ओठ बंद केले. त्यानंतर सगळे बोलणे थांबले.

सकाळी आभाला जाग आली आणि वास्तवात यायला तिला काही क्षण जावे लागले. मग तिला कालचा दिवस आठवला आणि क्रमाने सगळ्या घटना आठवल्या. तिने लाजऱ्या हसऱ्या तृप्त नजरेने बाजूला बघितले, तर असीम शांतपणे झोपला होता. तिने इतरत्र नजर फिरवली. तिचे लग्न पूर्णत्वास गेल्याच्या खुणा सगळीकडे पसरल्या होत्या. त्यांच्याकडे एक लाजरा कटाक्ष टाकत त्यासाठी कारणीभूत असणाऱ्या असीमच्या कपाळावर अगदी अलगद, त्याला डिस्टर्ब होणार नाही ह्याची काळजी घेत तिने ओठ टेकवले आणि अलगदपणे ती बेडवरून खाली उतरली.

फ्रेश होऊन ती किचनमधे आली आणि तिचा फोन वाजला. तिच्या आईचा व्हिडिओ कॉल होता. तिने तो उचलला आणि तिथेच टेबलावर मोबाईल ठेवून ती आरामात खुर्चीवर विसावली. त्यांच्या आधीच्या कॉलमधे आभा प्रचंड चिडली होती आणि तिने आई आणि सगळ्यांना जबरदस्तीच्या लग्नाबद्दल खूप काही सुनावले होते. त्यामुळे कॉल करताना आई जरा साशंक होती. पण कॉल चालू झाला आणि आभाचा हसरा चेहेरा झळकला. तेव्हा तिच्या आईने निश्वास सोडताना तिचे निरीक्षण सुरू केले. दोन दिवसातील ह्या चमत्कारातील बरेच पुरावे त्या आईला लेकीच्या चेहेऱ्यावर दिसत होते.

एका 'आईने' त्या गोष्टींचा योग्य अर्थ लावला. अत्यंत समाधानी, आनंदी आणि तितक्याच मिश्किलपणाने आईने लेकीची चौकशी केली. आभाला आईचा तो मिश्किल टोन कळला. आज चक्क आईशी बोलायला तिच्याकडे शब्द नव्हते. गेल्या कॉलमधे तिने केलेले आकांडतांडव तिला व्यवस्थित आठवत होते. आत्ता तसे काही चिडचिड करायला किंवा आरडाओरड करायला काहीही कारण नव्हते. आणि दोन दिवसात झालेल्या ह्या बदलाचे कारण सांगायची प्रचंड लाज वाटत होती. आभाला कळतच नव्हते की आईशी काय बोलावे. आपण आत्ता हा कॉल का उचलला असेच तिला वाटत होते.

तितक्यात असीम उठून फ्रेश होऊन खाली आला. येऊन तो आभाच्या मागे उभा राहिला. त्याने दोन्ही हात आभाच्या खांद्यावर ठेवले आणि अलगदपणे तिचे खांदे दाबले. फोनमधे दिसणाऱ्या आभाच्या आईला बघून त्याने "नमस्कार काकू" म्हणत त्यांना विश केले. त्याचा खांद्यावर झालेला स्पर्श, त्यातील ओढ आभाला जाणवली आणि "आई, बाय, उद्या करते कॉल" असे म्हणत तिने चक्क कॉल बंद केला आणि उठून ती असीमला सामोरी आली.

"काल..." असीमच्या तोंडून फक्त इतकेच निघाले आणि अत्यंत आवेगाने आभा असीमच्या मिठीत बद्ध झाली. 'मिस मॅच' हा शब्द कायमचा निघून गेला आणि त्यांची लग्नगाठ त्या मिठी इतकीच घट्ट झाली.

**लेखक - अमित नगरकर**
nagarkar.amit@gmail.com

# साहित्याचे माणिकमोती

## तिची शिकार....

उगवते ती सूर्य म्हणूनी पण नूर ती उजळीत नाही

उमलते ती सुमन म्हणूनी पण गंध ती उधळीत नाही

थिरकती नूपुरे पण तोल ती पेलीत नाही

हलवते ती कटी तरीही लचकतेची जाण नाही

धडकते ते काळीज पण श्वासांचा शिरकाव नाही

हासते ती मृगनयनी पण डोळ्यात त्या जान नाही

शब्द येती ओठी पण नाद त्यातून येत नाही

जा कुणी सांगा त्या अहिल्ये, थिजण्यात त्या अर्थ नाही

वाट पहावी श्री रामांची, अशी कलियुगी ह्या सोय नाही

**लेखिका - शीला सोगल**
Sheelasogal@gmail.com

## साहित्याचे माणिकमोती

### प्रतिबिंब.....

का कुणास ठाऊक मला आज सुचले जरासे
उलगडून पाहावे प्रतिबिंब तुझ्या प्रेमाचे

झटकावी धूळ अन् उलगडावी कवाडे काळाची
झाकून बघावे दिसते का झलक तुझ्या प्रेमाची

हातात घेऊन हात बागडावी ती आरास क्षणाची
हसतो मंद वारा देण्यास साक्ष तुझ्या असण्याची

क्षण जगलो असे की सतत तुझाच ध्यास घ्यावा
अलगद झेलुनी शब्द तुझे जगण्या नवा अर्थ द्यावा

क्षितिज झाले ओले अन् अंबर भरून आले
नदीच्या काठावरती प्रेमास भरते आले

पाऊसही मुग्ध झाला अन् ओठी तो विसावला
टिपता तो मोती मी अन् भावही ओथंबला

लाजली तू जराशी सावरून मग स्वतःला
कटाक्ष तुझ्या नजरेचा घायाळ करुन गेला

प्रेमाच्या लाटेवरती आयुष्य हे घडत गेले
साथ तुझी लाभली अन् डोळे पाणाऊन गेले

का कुणास ठाऊक मला आज सुचले जरासे
मन सुखावले पाहता प्रतिबिंब तुझ्या मनाचे

मन सुखावले पाहता प्रतिबिंब तुझ्या मनाचे!

**लेखक - लाभेश शेवलकर**
labhesh.shewalkar@gmail.com

# आठवणींची शिदोरी

## ३० खिडक्या आणि २२ दरवाजे

माझ्या स्वतःच्या आठवणी तयार होण्याआधीच्या आठवणींमधून - म्हणजे आई, जुने शेजारी, घरात काम करणारी बबीची आई, आत्या, काका ह्यांच्या आठवणींमधून मला ठाण्याच्या आमच्या 'मोडक्या' घराची कल्पना येते. ज्या दूरच्या नातेवाईकांनीं तें घर दाखवलं होतं, ते दादांना म्हणाले होते, "अहो, तुमच्या वैजनाथच्या घराचा गोठाही बरा असेल. मला ही जागा तुम्हाला दाखवायला खरं तर अगदीं लाज वाटते आहे, पण माझ्या पहाण्यात ही एकच जागा ह्या भागात आहे". दादा, वहिनींनी (दादा, वहिनी म्हणजे माझे आई, वडील) जास्ती चिकित्सा न करता जागा घेतली. दादा, वहिनी, १ वर्षाची मी, इंदू आत्या, मालू आत्या, बापू आणि जाऊन, येऊन मुकुंदमामा. पाणी वाडीत लांब असलेल्या विहिरीवरून आणावं लागे. घर पहिल्या मजल्यावर होतं. इमारत असंख्य टेकूंच्या जोरावर तग धरून होती. चुना लावलेल्या भिंती आणि मोडकळीस आलेली गॅलरी. माझा स्वभाव जुन्या आठवणी(वस्तूरूपातल्या), पुस्तकं, वह्या, खडू, पेन्सिली - सगळं सांभाळून ठेवण्याचा. वहिनीचा तसा नसावा. वहिनीची आई ती सात वर्षांची असतांना गेली. ती खूप हुषार आणि टॅलेंटेड असणार असं मला वाटतं. वहिनी ४-५ वर्षांची असतांना तिनी शिवणाच्या क्लासमधे स्पर्धेत भाग धेऊन पहिल्या बक्षिसाचा चांदीचा कुंकवाचा करंडा मिळवला होता. हा कुंकवाचा करंडा मी मोडक्या घराच्या गॅलरीतून खाली रस्त्यावर फेकून दिला होता. तो कांहीं परत मिळाला नाहीं. वहिनीचे वडील -नाना पार्ल्याला रहात. ते मधे मधे आपल्याकडे काम करणाऱ्या कारकुनांना ठाण्याला पाठवीत आणि टेकू किती वाढले आहेत ते विचारीत. दर वेळी एखाद दुसरा वाढलेलाच असे. तर असं हें माझ्या आयुष्यातलं पहिलं घर. हें मला वाटतं स्वयंपाक घर, दोन खोल्या,आणि एक गॅलरी असं होतं.

मालकांनीं लौकरच दुसरी आधुनिक सुंदर बिल्डिंग बांधली. ह्या बिल्डिंगमधे आम्ही थोडे दिवस दोन खोल्यांच्या जागेत आणि नंतर तीन खोल्यांच्या जागेत राहिलो. तीन खोल्यांच्या जागेला खिडक्या दोनच होत्या, मात्र गॅलऱ्या तीन होत्या आणि दरवाजे पाच. आईनी खिडक्या, दरवाजे पडद्यांनीं सजवले होते. मागच्या गॅलरीतून ते पुढच्या आणि मधल्या खोलीच्या उंबरठ्यापर्यंत एक पॅसेज असावा अशी मोकळी जागा होती. क्रॉस व्हेंटिलेशनमुळे त्या भागात छान वारा येत असे. वहिनीला दुपारी कधी झोप येत नसे. चटई घालून ती ह्या मधल्या पॅसेजमधे पुस्तक वाचत पडायची. सुट्टीच्या दिवसांमधे माझा मुक्काम वहिनीजवळ चटईवर असे. ती आमच्यासाठी खूप पुस्तकं विकत घेत असे. ‘आनंद’ आणि ‘चांदोबा’ची ती वर्गणीदारच होती. स्वतः कासवाच्या गतीने त्या गोष्टीं वाचायला नको वाटे. वहिनी त्या कशा भराभर, न अडखळता वाचीत असे! स्वतःला वहिनी इतकं भरभर वाचता येत नसल्याने वहिनीने सगळ्या गोष्टी वाचून दाखवाव्यात म्हणून माझा आग्रह असे. तिने तेव्हा जर तो हट्ट पुरवला नसता, तर केवढ्या तरी बाल वाङ्मयाला त्या योग्य वयात आम्ही मुकलो असतो, असं वाटतं. वहिनीने वाचून दाखवलेल्या कितीतरी गोष्टी अजूनही आठवतात. ह्या घरात रहात असतानाच माझं लग्न झालं. वहिनी कालांतरानी दुसऱ्या घरात रहायला गेली. लग्नापूर्वीच्या दारं, खिडक्यांचा हिशोब आता संपला. आता माझ्या संसारातल्या खिडक्या, दारांचा नवीन हिशोब सुरू झाला होता.

पहिलं घर होतं दिल्लीला, करोल बागेत. तीन मोठ्या खोल्या, तिन्ही मोठ्या खोल्यांच्या पुढे एक मोठी गॅलरी. स्वयंपाकघर म्हणजे एका वेळी फक्त एकाच माणसाला वेगवेगळ्या कोनात उभं रहाता येईल असं टिचभर. बाहेरच्या रस्त्याच्या बाजूला उघडणारी एक खिडकी आणि बेडरूमला चार खिडक्या. एकूण पाच खिडक्या आणि पाच दरवाजे असलेल्या ह्या घरात माझा मुक्काम एखादं वर्षच होता.

माझं नंतरचं घर नेफा म्हणजे भारताच्या नॉर्थ-ईस्ट सीमेवरच्या रोइंग, ह्या चिमुकल्या पण महत्वाच्या गांवातलं. दिल्लीतलं माझं रहाणं वर्षभरातच संपलं. मोहनची बदली नेफामधे म्हणजे भारताच्या उत्तर पूर्व (ईशान्य) सीमेवर भारताच्या हद्दीतल्या हिमालयातल्या उंच सरहद्दीजवळच्या रोइंग ह्या छोट्याशा गांवात झाली. भारत सरकारचं हिमालयाच्या दुर्गम भागात रस्ते बांधायचं काम सुरू होतं. मी माझ्या वर्षाच्या मुलीला ह्याच आमच्या घरात घेऊन गेले. मला तो पहिला प्रवास अजून चांगला आठवतो. मुंबईहून विमानाने कलकत्त्याला, तिथून दुसऱ्या विमानाने दिब्रूगढला, दिब्रूगढहून जीपने तिनसुखियामार्गे सदियाला. सदियाहून ब्रह्मपुत्रा पार करून धोलामार्गे जीपने रोइंगला. पावसाळ्याचे दिवस नसले, तर हा प्रवास १२-१३ तासांमधे पुरा होत असे. घर छानच होतं. तिकडच्या इतर घरांप्रमाणे हें घर ही जमिनीपासून २-३ फुटांवर बांधलेलं होतं. हिमालयाच्या ह्या भागात लॅंड-स्लाईड्स खूप होतात. नुकसान कमी व्हावं म्हणून घरं पातळ भिंतींचीं बांधलेलीं असतात. जमिनीपासून मोकळ्या ठेवलेल्या भागात कोंबड्या ठेवता येत. ट्रायबल कॉन्ट्रॅक्टर दुभत्या गाई भाड्याने देत. त्यांना खाऊ-पिऊ घाला, त्यांचं दूध वापरा. आमच्याकडे असलेले नेपाळी कुक, माळी त्यांची चांगली काळजी घेत. स्वयंपाक घरात फ्लोअरिंग कॉन्क्रीट्चं, बाकीच्या घरात लाकडाचं. स्वयंपाक घरात उभ्याचा ओटा, पण जाळायला लाकडं. महिन्यातून एक-दोन वेळा हत्ती साखळीला बांधलेला मोठा ओंडका मागच्या अंगणात आणून टाकत असे. माळी, इतर नोकर तो फोडून त्याचं सरपण करीत. ऑफीसची जीप महिन्यातून दोन वेळा(पावसाळा नसतांना) तिनसुखिया, दिब्रूगढ पर्यंत जात असे. सर्वांचं थोडं, थोडं वाण सामान येत असे. ह्या घराला १० दारं आणि १५- १६ खिडक्या होत्या. मग तिनसुखियाहून खैतान नांवाच्या दुकानातून पडद्याचं कापड आणून गावांतल्या शिंप्याकडून सगळ्या खिडक्या, दरवाजांना पडदे शिवले होते.

नेफामधे तीन वर्षं राहिल्यावर आम्ही आलो मुंबईला. थोडे दिवस वडाळ्याच्या फ्लॅटमधे- ६-७ खिडक्या आणि ७-८ दरवाजे असलेल्या घरात राहून मग आम्ही माहीमला रहायला आलो. माहीमच्या घराला सगळ्या खोल्यांच्या गॅलऱ्या खोल्यांमधेच घेतलेल्या होत्या, मात्र आमच्याच फ्लॅटला स्वतंत्र अशी गच्ची होती. गच्ची फारच छान होती. विद्या आणि जीतेंद्र अभिषेकी एकदा आमच्याकडे आले होते, परत जात असतांना अभिषेकी विद्याला म्हणाले, "मला अशी गच्ची असलेली जागा मिळाली, तर माझा रोजचा रियाज किती चांगला होईल." माहीमच्या घराला खिडक्या भरपूर होत्या - एकूण १२. दरवाजे होते ७. माहीमची जागा आमची मुंबईतली किंवा भारतातली म्हणा - शेवटची जागा.

भारत सोडून आम्ही गल्फ मधल्या दुबईजवळच्या शारजामधे तीन वर्षं आणि शेजारच्या मस्कतमधे तीन वर्षं मोठ्या, मोठ्या जागांमधे राहिलो. खिडक्या उघडायची संधी फारशी मिळत नसे. पण घराला खिडक्या, दरवाजे भरपूर असत. शारजाला तीन घरांना मिळून ३१ खिडक्या आणि २१ दरवाजे होते. मस्कतच्या दोन घरांना मिळून २० दरवाजे आणि ९ खिडक्या होत्या. मात्र वाळवंटामधे एअरकंडिशनिंगला पर्यायच नसल्याने घराला खिडक्या असल्या, तरी त्या उघडून स्वच्छ हवा आत घ्यावी अशी परिस्थिती माझ्या ३ वर्षांच्या मुक्कामात एकदाही उद्भवली नाहीं.

मस्कतनंतर आम्ही अमेरिकेला येऊन पोचलो, त्यालाही आता ३०-३५ वर्षं झालीं. अमेरिकेला आल्यावर पहिल्यांदा आम्ही फ्लॉरिडाला एका अपार्टमेंट मधे राहिलो. आमचा भोवतालचा भाग नीट जाणून घेतला. पुढे काय करायचं ह्याची मनात तयारी केली आणि सध्या रहातो, त्या घरात आलो. घर चांगलं होतं, पण अगदी कांहीं टिप-टॉप कंडिशनमधे नव्हतं. १३ खिडक्या आणि ११,१२ दारं असलेल्या ह्या घराने खूप माणसं पाहिली आहेत. सुरुवातीला घरात आम्ही दोघ, दोन्ही मुलं, मोहनच्या आत्या आणि आमचा कुत्रा फेदर्स असे होतो. घरातल्या प्रत्येक माणसाला आपल्या आवडीने घर सजवण्याची पूर्ण मुभा होती. मोहनच्या आत्या ज्या बालविधवा होत्या आणि आपल्या भावाच्या म्हणजे माझ्या सासऱ्यांच्या घरीच राहत होत्या. लग्नात जोडयानी नमस्कार करतांना मोहनने "ह्या माझ्या आत्याबाई, मला आईसारख्याच आहेत" अशी ओळख करून दिली होती. फेदर्स म्हातारा होऊन गेला. वयोमानाप्रमाणे आत्याबाई थकल्या आणि ९८ वर्षांच्या होऊन आम्हाला सोडून गेल्या. त्यांची "चाळीशी" जी त्यांना ७० वर्षांच वय झाल्यावर वापरावी लागली ती माझ्या मुलाने, अक्षयने त्यांची आठवण म्हणून जपून ठेवली आहे. आत्याबाई गेल्यावर माझी आई आमच्याकडे राहायला आली. ती आमच्याकडे आठ वर्षे राहिली. ह्या घराने तिचा शंभरावा वाढदिवस पाहिला. माझी शतायुषी आई १०१ वर्षांची होऊन आम्हाला सोडून गेली.

दोन्ही मुलांची लग्न होऊन त्यांनी आपापला स्वतंत्र संसार अमेरिकेत दोन वेगवेगळ्या राज्यांमध्ये थाटला आहे. एकेकाळी भरलेलं घर आता आम्हा दोघांना मायेची ऊब देत उभं आहे. लहानपणी वडिलांनी सांगितलेलं अजून लक्षात आहे. "घरात नेहेमी शुभ बोलावं, गृहदेवता तथास्तु म्हणत असते". रोज झोपतांना गृहदेवतेची प्रार्थना करून तिला मी सांगत असते – 'माझं शुभ लक्षणी घर असचं राहुं दे'.

**लेखिका - *शशीकला लेले***
*naupada@yahoo.com*

# आठवणींची शिदोरी

## रम्य ते आजोळ

कितीही ठरवले की आज लवकर घरी जायला निघायचे, तरी रोजच्याप्रमाणे आजही कामे संपली नाहीत. नेहमीप्रमाणे आज पण शाळेतून घरी निघायला उशीरच झाला. बरोबर निबंध घरी तपासायला घेतलेला वह्यांचा गठ्ठा होताच. पाचव्या तासाला मुलांचे लक्ष कमी होते. त्यांना शिकवलेले समजले की नाही याबद्धल जरा मनात शंकाच होती. दोन आठवड्यात नव्या शिक्षकांसमोर बोलायचे आहे त्याची रूपरेखा उद्याच्या उद्या पाठवून द्यावयाची आहे, याचे पण मनावर जरा दडपण आलेले होते. गाडी मुख्य मार्गाला लागली आणि वाहनांची ही गर्दी सुरू झाली. त्यामुळे माझा वेग मंदावला आणि दमलेल्या मनातील अस्वस्थता वाढली. एव्हाना पोटातही भुकेचा डोंब उसळला होता. इतक्यात समोर लक्ष गेले तर पेट्रोल कमी असल्याचा केशरी दिवा लागलेला. वाहनांमधून मार्ग काढत काढत वाटेवरच्या पेट्रोल पंपावर गेले, तर नेमके आज तेथे पेट्रोलचे दुर्भिक्ष्य. बऱ्याच वेळाने एकदाची घरी पोचले पण घरात कोणीच नव्हते. हे मुलांना शाळेतून आणायला गेलेले असणार. समोर कॉफी टेबलावर पत्रांचा पसारा पडलेला होता. माझ्याकडे पण थोडे लक्ष दे ना असे माझे मोकळे घर मला आक्रंदून म्हणत होते. मुले भूकेजून घरी येणार तेंव्हा त्यांच्या खाण्यापिण्याचे आता बघायला पाहिजे होते. परंतु माझ्याही नकळत मी हातातले सामान खाली ठेवले आणि माझी पावले घरामागच्या बागेकडे वळली.

सूर्य अजून तीव्र होता. पण उंच वाढलेल्या झाडांमुळे बागेत त्याची झळ लागत नव्हती. एखाद्या यंत्राप्रमाणे मी तळ्याच्या काठाशी, चिंचेच्या बुंध्याशी जाऊन बसले. ही माझी आवडती जागा. इथे शांतता स्वतःच निवारा शोधीत थकून आलेली असते. शेजारच्या आंब्याच्या पानांनी हसून माझे स्वागत केले आणि मन क्षणार्धात माझ्या बालपणी जावून थडकले.

आमचं जोशी कुटूंब खूप मोठे. कोणाचे लग्न असो की मुंज किंवा एवढ्या तेवढ्या कोणत्याही कारणाने आम्ही सारे उन्हाळ्याच्या सुट्टीत आमच्या गावी रांजणीला जमायचो. आजी आणि सगळ्यात मोठे काका-काकू तेथेच राहायचे. बाकी सारे नोकरी धंद्यामुळे बाहेर पडलेले आणि वेगवेगळ्या शहरांमध्ये स्थाईक झालेले. ते सारे मे महिन्याच्या सुट्टीमध्ये एकत्र यायचे. आजोबांनी बांधलेले हे माझे आजोळचे घर खूप मोठ्ठे. अगदी चौसोपी, जुन्या पद्धतीचे, भक्कम. बाहेरच्या भिंती काळ्या दगडाच्या, किल्ल्याच्या तटबंदीची आठवण करून देणाऱ्या. घरासमोर दगडी कठडा असलेली खोल विहीर. या विहिरीचे पाणी कधीच आटायचे नाही. दगडी पायऱ्या चढून दिंडी दरवाज्यातून आत गेल्यावर समोर स्वच्छ, चापून चोपून सारवलेले भव्य अंगण. अंगणाच्या चारी बाजूस प्रशस्त खोल्या. डाव्या बाजूस सुंदर तुळशी वृंदावन. त्यात सदैव कृष्ण तुळस मंद वाऱ्यावर झूलत असलेली. त्याच्यामागच्या दारातून आत गेले की ऐसपैस स्वयंपाकघर. तेथे कायम चुलीची धग जाणवायची. स्वयंपाकघराच्या दुसऱ्या टोकाला स्वयंपाकघराच्या रुंदीइतकीच एक छोटीशी पायरी. (पायरी कसली छोटा ओटाच तो.) तर पायरी चढून सात आठ पावले गेले की मागच्या भिंतीमध्ये सुबक देवघर. पायरीच्या दोन्ही बाजूस भिंतीमधलीच फडताळे. त्यात वर्षभराचे लोणची, पापड, सांडगे, साखरआंबे असे जिन्नस भल्या मोठ्या चिनीमातीच्या बरण्यांमध्ये भरून ठेवलेले आणि वर रंगीबेरंगी कापडाचा दादरा बांधलेला.

उजव्या हाताला फडताळाच्यामध्ये दार. या दारातून आत गेले की माजघर. या खोलीला खिडक्या नाहीत, फक्त वरती छताला दोन झरोके. आम्ही मुले जेंव्हा वरती गच्चीवर जायचो तेंव्हा या झरोक्यामधून हाताने वेगवेगळे आकार करून उन्हाचे कवडसे पाडायचो. माजघरामधून आणि स्वयंपाकघरामधून दारे उघडावयाची ती लांब रुंद पडवीमध्ये.



पडवीला अंगणाच्या बाजूला दोन्ही बाजूकडून भिंत बांधत आणलेली. त्यामुळे छान आडोसा तयार झालेला. मध्यावर सहा-आठ फूट मोकळी जागा ठेवली होती, अंगणामध्ये जायला यायला. भरगच्च सायलीची कमान या प्रवेशद्वाराला शोभिवंत करीत असे. भिंतींच्या दोन्ही बाजूला खाली अंगणामध्ये कर्दळीचे गच्च वाफे. पडवीमध्ये सारे होम-हवन व्हावयाचे आणि नंतर मिष्टान्न जेवणाच्या पंक्ती उठावयाच्या. पडवीमध्ये ओळीने लाकडी खांब उभे. पडवीच्या दुसऱ्या बाजूने एक छोटे दार. या दारातून वरती जायला अरुंद, भुयारासारखा बंद असा छोटासा दगडी जिना. ताठ चाललात तर डोके वरती आपटलेच म्हणून समजा. वरती गेल्यावर उजव्या बाजूच्या खोलीत आंब्याची आढी घातलेली असावयाची. सारे आमच्या शेतावरचे आंबे! डाव्या बाजूला छोटे दार गच्चीवर उघडायचे. गच्चीवरून पाहिले की एका बाजूला रांजणी गाव, तर दुसऱ्या बाजूला साऱ्या शेतजमिनी आणि लांबवर दिसायची क्षितिजाची रेखा. खाली अंगणाच्या बाजूच्या काही खोल्या खूप अंधाऱ्या की जेथे आम्हा छोट्या मुलांना एकटे जायला भीती वाटायची. मग थोरली भावंडे आम्हाला त्या बाबतीत काही काही सांगायची, जसे की तेथे गुप्त खजिना आहे किंवा त्या खोलीमधून भुयार निघते. आणि आम्हाला ही ते सारे खरे वाटायचे.

पडवीपासून डावीकडे गेले की मागच्या बाजूला ऐसपैस गोठा. गोठ्यामध्ये गजा आणि गुलब्या या बैलांची जोडी कायम असावयाची. पाहुण्यांना कुठेही न्यावयास ही जोडी बैलगाडीस बांधली की डुलत डुलत घेवून जायची. अंगणाच्या एका बाजूला भल्या पहाटे, एका मोठ्या हंड्यामध्ये सर्वांसाठी आंघोळीला पाणी तापत असायचे. कधी कधी मोठी भावंडे टूम काढावयाची आणि शेतावरच्या विहिरीवर पोहायला जायची. त्यांच्याबरोबरीने मग आई आणि काकूलोक कपडे धुवायला शेतावरच्या विहिरीवर निघावयाच्या. मग त्यांच्यापाठोपाठ आम्ही लुटूपुटू पण. काका आणि बाबा कायम आमच्या सोबत असायचे. साड्या धुवून झाल्या की आम्ही दोघी बहिणी त्या दोन टोकांना धरून एकमेकींपासून लांब उभ्या राहावायचो. ते आमचे नेमून दिलेले काम. इतका वारा असायचा की पाच मिनिटात साडी

वाळून तयार. (Think about today's energy consuming dryers and Eco-friendly living!) मी तेव्हा नुकतीच पोहायला शिकले होते. मोठ्या भावंडांबरोबर मी पण हट्ट धरला की मला पण विहिरीत पोहायचे म्हणून. पायऱ्यांची ती विहीर होती. बाबांना मला एकटीला आत पोहायला सोडायचे कसे अशी काळजी वाटत होती. त्यावर उपाय म्हणून बाबा स्वतः विहिरीत अगदी खालच्या पायरीवर उतरले. त्यांनी माझ्या कंबरेला मोठाच्या मोठा दोरा बांधला, एक टोक स्वतःच्या हातात घट्ट धरले आणि मग मला आत पोहायला सोडले.

एका सुट्टीमध्ये आम्ही दुपारच्या वेळेस शेतावर गेलो होतो. अशोकदादाने एका झाडाकडे आमचे लक्ष वेधले. झाड कैऱ्यांनी लगडलेले होते. विशेष म्हणजे हे झाड बाबांनी लावलेले होते, केंव्हा तर बाबा जेंव्हा शाळा संपवून उच्च महाविद्यालयात गेले होते तेंव्हा. त्या झाडाला या वर्षी पहिल्यांदा कैऱ्या लागल्या होत्या! कोणीतरी दोन-चार कैऱ्या पाडल्या. कोणीतरी त्या कापल्या आणि सर्वांना तिखट मीठाबरोबर खायला दिल्या. नंतर शेतावरचे लोक पिकाला पाणी देत होते. आम्ही मुले पाटाच्या पाण्यात खेळत होतो. एकदम आमचे दोघे-तिघे मोठे भाऊ आमच्याजवळ आले आणि आम्हा छोट्यांना घेवून लगबगीने आडोश्याला, शेतातल्या टपरीखाली घेवून गेले. त्यांनी आम्हाला दूरवर बघावयास सांगितले. आम्ही तेंव्हा अक्षरशः पाऊस आणि वीजांसह पुढे पुढे वेगाने, भिंतीसारखे सरकत येणारे वादळ पाहिले!

सुट्टी मधला जेवणाचा थाट काय विचारावा? आम्ही सारे जमलो म्हणून आजी आणि घरच्या बायका मोठा घाट घालायच्या. पुरणपोळी सर्वांची आवडती. आंबे तर घरातलेच. केळीच्या पानावरचे मिष्ठान्न जेवण खाताना, हमखास आमचे एक आजोबा (ज्यांना मी कधीच पहिले नव्हते) कसे पुरणपोळी आणि आंबरस एकत्र खावयाचे याचा किस्सा ऐकवला जायचा. थोड्याशा भातामध्ये पानाचा द्रोण चिकटवून त्यात आमटी वाढली, तरी कोणाचा द्रोण उभा टिकून राहिला याबद्धल आम्हा मुलांमध्ये स्पर्धा लागायची. रात्रीच्या वेळी कंदिलाच्या प्रकाशात, मोठमोठ्यांदा गप्पा मारत मारत चुलीवर भाजलेल्या पापडासोबत, तेल आणि लसणाची चटणी आणि भात पिठल्यावर सारे ताव मारायचे. कधी अंगणात शेकोटी पेटवून, त्यात बागेमधून आणलेली रताळी, भुईमूगाच्या शेंगा भाजून खायचो. मग एखाद्या दिवशी रात्रीची जेवणे आटोपल्यावर आजी सर्वांना घेवून चुलीपाशी बसायची आणि एकेका कुटुंबाला पुढे बसायला सांगून सर्वांची; म्हणजे अगदी लहानांपासून सगळ्यात मोठ्ठ्या काकांपर्यंत सर्वांची; गाणे म्हणत म्हणत; लाल मिरचीने दृष्ट काढायची. मग आई काकूच्या कानात हळूच कुजबूजायची "केवढया या मिरच्या चुलीत, माझे वर्षभराचे तिखट झाले असते". काकूही आईच्या मताशी सहमत होवून मग हळूच हसायची.

संध्याकाळची जेवणे झाली की न चुकता सारी मुले गच्चीवर गोळा व्हायची. ही वेळ बापुकाकांची, त्यांच्या खास गोष्टी सांगण्याची. त्यांच्या साऱ्या गोष्टी भीतीच्या म्हणजे महा भीतीच्या. घाबरून मग आम्ही छोटी मुले आईकडे खाली धावत जायचो. नंतर बापूकाका आम्हाला परत बोलवायचे आणि गंमतशीर गोष्टी सांगायचे. या नंतरच्या गोष्टीमध्ये हिरोचे कायम पोट बिघडलेले असायचे आणि शत्रूवर तो असा काही मोठा बार सोडायचा की शत्रू थेट चंद्रावर उडून जायचा! कधी कधी गावाहून कोणी येणार असेल तर आम्ही लांबवरून दिसणाऱ्या एस टी गाडीच्या दिव्याचा माग गच्चीवरून घेत राहायचो. दिवा दिसायला लागल्यापासून अर्ध्या तासात पाहुणा घरी हजर असे. वर खचाखच चांदण्यांनी भरलेले आकाश, बाजूला गावातल्या घरांमधले मिणमिणते कंदील आणि सभोवार पसरलेले काळेभोर माळरान आणि त्याच्या पलिकडच्या दूरपर्यंतच्या शेतजमिनी, रातकिड्यांची किरकिर आणि खाली

पडवीतून साऱ्या मोठ्या माणसांचे मोठमोठ्या आवाजात दिलखुलास गप्पा मारण्याचे आवाज, यात निद्रादेवी तिच्या कुशीत केंव्हा घेई हे लक्षातही यायचे नाही.

"आई ए आई, कोठे आहेस ग तू? कित्ती भूक लागली." माझ्या मुलीची हाक ऐकून मी एकदम भानावर आले. मुले घरी आली होती. "ती बघ येथे तिच्या आवडत्या जागी बागेत बसली आहे." माझ्या मुलाने त्याच्या बहिणीस माहिति पुरवली. अगो बाई, किती वेळ मी येथे बसले होते कोणास ठाऊक? पण आता मन पूर्ण शांत झाले होते. बालपणीच्या रम्य आठवणींनी मनास ताजे तवाने केले होते. लगबगीने मी घरात आले आणि पदर खोचून पुढच्या कामाला लागले.

*(** रांजणी खेडेगाव मिरजेजवळ, महाराष्ट्र-कर्नाटक सीमेपाशी आहे. माझ्या लहानपणी आम्ही कवठेमहांकाळला आगगाडीतून उतरून मग एस टी बस घेऊन रांजणी बस स्थानकावर उतरायचो. तेथे मोठ्या काकांनी पाठवलेल्या बैलगाड्या आमच्यासाठी उभ्या असायच्या. एव्हाना साधारणपणे अंधार पडलेला असायचा. कंदिलाच्या प्रकाशात, बैलांच्या गळ्यात बांधलेल्या घुंगरांच्या आवाजात आम्ही घरी पोचायचो. मोठी काकू आम्हा सर्वांवरून भाकरी ओवाळून, मगच दिंडी दरवाजातून आत येऊ द्यायची.)*

माझी खात्री आहे कि माझ्या आठवणीतले रांजणी गाव आणि आत्ताचे रांजणी गाव यात खूप फरक असणार आहे. वर लिहिलेल्या आठवणी मात्र माझ्या मनात अजूनही तितक्याच टवटवीत आहेत.

**लेखिका वंदना गुडी**
MrsGudi@gmail.com

# खाना खजाना

## चारधाम धरमशाळा डाळ

साहित्य:

१ कप ऊडदाची सालासकट डाळ

१/२ कप पातळ तूप

१/४ चमचा जीरे

१ मोठी वेलची ठेचलेली

४ हिरवी वेलची

ठेचलेली

२" दालचिनी तुकडा

१ हिरवे तमालपत्र

२ सुक्या लाल मिर्च्या

१/२ कप फेटलेले दही

१ टेबल स्पुन हेवी क्रिम

खालील गोष्टी एकत्र करणे.

भाजलेले खोबरे

कृती:

चला तर मग सुरु करुया! ऊडदाची डाळ रात्रभर भिजत घालणे.

नंतर सकाळी, चोळून- चोळून साले काढणे.

पाणीही वेळणे.

प्रेशर कुकर मधे तूप चांगले गरम करणे त्यात खडे मसाले घालणे व लगेच जीरे घालणे,

त्यावर डाळ घालून १० मिनिटे, मध्यम आचेवर परतणे. मग कोरडे मसाले घालणे.

मंद आचेवर शिजविणे.

प्रेशर लावायचं नाही.

नंतर दही- क्रिम एकत्र करून घालणे.१/२कप पाणी घालणे.

तसेच खोबरे घालणे.

आता प्रेशर लाऊन ३ शिट्ट्या काढणे.५ मिनिटे मंद आचेवर ठेवणे.

मग गॅस बंद करणे.

प्रेशर पडल्यावर कुकर ऊघडणे.

छान, सुगंधी डाळ तयार आहे.

ही डाळ अजिबात चिकट होत नाही.

थंडीच्या दिवसात खावी.

भरपूर प्रथिने युक्त आहे.

एक टीप—- तुपाचे प्रमाण कमी करु नये

**शेफ शीला सोगल**

Sheelasogal@gmail.com

## खाना खजाना

# पिठल्यातली पोळी

नमस्कार मित्र मैत्रीणिंनो, मी अस्मिता from Asmita's kitchen. रोजच्या जेवणात जर पोळ्या उरल्या तर घरची गृहिणी त्यांची फोडणीची पोळी करून एखाद वेळ निभावून नेते. तर त्याच शिळ्या पोळ्या घेऊन अजून एक सोप्पा पण चविष्ट पदार्थ आम्ही बनवतो, तो म्हणजे पिठल्यातली पोळी. चला तर मग, बघूया त्याची रेसिपी:

साहित्य:

- २ शिळ्या पोळ्या
- १ ते १.५ टी स्पून तेल
- ४ – ५ लसूण पाकळ्या, बारीक चिरलेल्या
- फोडणीचे साहित्य – तेल, मोहोरी, हळद, तिखट, हिंग
- १ वाटी दहयाचे ताक
- २ टेबल स्पून डाळीचे पीठ (बेसन)
- चवी प्रमाणे मीठ

कृती:

प्रथम १ वाटी दहयाच्या ताकात २ टेबल स्पून डाळीचे पीठ (बेसन) आणि चवी प्रमाणे तिखट घालून नीट एकजीव पातळ मिश्रण बनवावे.

२ शिळ्या पोळ्यांचे बारीक तुकडे करून घ्यावे. बारीक *तुकडे* – एकदम बारीक कुचकरा नाही

भांडे मंद आचेवर ठेऊन त्यात १ ते १.५ टी स्पून तेल टाकावे. त्यात थोडी मोहोरी टाकावी. मोहोरी तडतडल्यावर त्यात बारीक चिरलेल्या लसणाच्या पाकळ्या घालाव्या आणि परतवावे. लसूण थोडा लाल व्हायला लागला की त्यात थोडी हळद, हिंग टाकावे.

त्या भांड्यात मग बनवून ठेवलेले दही – बेसनाचे पातळ मिश्रण टाकावे. हे मिश्रण शिजून त्याला थोडीशी चकाकी आली की त्यात पोळ्यांचे तुकडे टाकावे. एक उकळी आली की झाली आपली डिश तयार 😊

गरम गरम खातांना त्यावर (हवे असल्यास) थोडे कच्चे तेल घेता येते. त्याने त्याच्या चवीत छान बदल होतो. तसेच खातांना वरुन थोडेसे मीठ देखील भुरभुरू शकतो. वरुन घेतलेल्या मिठाने ही पिठल्यातली पोळी अजून चविष्ट लागते.

**शेफ अस्मिता नगरकर**
**from Asmita's Kitchen**
asmita.nagarkar@gmail.com

# खाना खजाना

## मेथी मटर मलई (रेस्टारंटसारखी)

*साहित्य:*

अर्धा कप काजू (३० मिनिटे पाण्यात भिजवलेले)

६ टेबलस्पून तेल (विभागून)

१ टीस्पून जिरे

दोन इंच दालचिनीचा तुकडा

६ वेलची (ठेचून)

२ पाने तमालपत्र

२ मोठी वेलची(ठेचून)

१ कप जाड कापलेला लाल कांदा

८ लसणीच्या पाकळ्या

२ इंच आल्याचे तुकडे

८ छोट्या हिरव्या मिरच्या मोठे तुकडे

२ लाल टोमॅटो मोठे तुकडे

१ जुडी मेथी (बारीक कापून १/२ चमचा मीठ लावून ठेवावी)

४ कप फ्रोझन मटार (कोमट पाण्यात २० मिनिटे भिजवावेत)

१ टीस्पून प्रत्येकी धणा पावडर, हळद, काश्मिरी लाल तिखट एकत्र करावे

१ टीस्पून गरम मसाला

१/२ कप हेवी व्हिपिंग क्रीम

कोथिंबीर

कृती:

एका भांड्यात २ चमचे तेल गरम करून जिरे घालावे. २० सेकंद परतून मग त्यात दालचिनी, तमालपत्र, दोन्ही वेलची घालून थोडे परतावे. मग आले, लसूण, मिरची घालून ३० सेकंद परतावे. आता कांदा घालून तो १० मिनिटे मध्यम आचेवर परतावा. मग टोमॅटो व भिजवलेले काजू घालून मंद आचेवर झाकण ठेऊन टोमॅटो मऊ होईपर्यंत शिजवावे. हे सर्व मिश्रण थंड करून मिक्सरमधून बारीक वाटून घ्यावे.

मीठ लावलेल्या मेथीतील पाणी दाबून काढून टाकावे. थंड पाण्यात धुवून परत पाणी काढून टाकावे. ह्यामुळे मेथीचा कडूपणा निघून जातो.

एका भांड्यात २ चमचे तेल घालून त्यावर मेथी चांगली परतावी. त्यात हळद, तिखट, धणा पावडर घालून एकत्र करावे. शिजवलेली मेथी बाजूला ठेवावी.

एका भांड्यात २ चमचे तेल गरम करून त्यात वाटलेला मसाला चांगला परतून घ्यावा. त्यात मटार व एक कप पाणी घालून उकळी आणावी. मग झाकण ठेऊन मंद आचेवर मटार शिजवून घ्यावे. त्यात परतलेली मेथी, गरम मसाला व चवीप्रमाणे मीठ घालावे.

वाढण्याच्या आधी १/२ कप हेवी क्रीम व १/२ कप कोमट दूध एकत्र करून त्यात घालावे. वरून सजावटीसाठी कोथिंबीर घालावी.

ही भाजी पोळी, पुरी किंवा नानबरोबर छान लागते. पार्टीसाठी जरूर करून बघा. हे प्रमाण १५-२० लोकांसाठी आहे.

**शेफ शीला सोगल**

Sheelasogal@gmail.com

## सिनिअर्स कॉर्नर

### *This and that….*

“Life begins at Fifty” is a true statement. When I was young, I thought, such a thing is so outrageously false.
How could life begin at fifty?

Of course, when you are young you are busy growing up, starting a career, starting married life, buying houses and furniture, and raising kids! That is life also. But I have come to realize that this phase is to prepare yourself, lay the foundation for the next phase. It’s almost like a pre-game warmup.

People who just reached this mile-marker won’t understand it, yet.

Then at fifty, ‘life’ really begins. This is when the extended warranty on your body expires. The bones and joints start to ache, other bodily ailments creep in, doctors’ visits get frequent and things you could do effortlessly become harder and harder to do.

However, apart from this there are a host of advantages.
You will have climbed the career hurdles, you don’t have to brush your children’s teeth anymore or put their shoes on for them.
You will have some money in the bank account and start taking long trips.
You will have time on your hands, something you never had before.
You will get to spend lot more time with your spouse and friends, something you could never do before.
You can pursue your hobbies that you only dreamed about.
You will have acquired a position in your workplace and the society that you had hoped for.
You start reaping the benefits of all the hard work you put in. Your investments bring in hefty dividends.
You will laugh at all the silly things you did when you were younger and give credit to yourself for how you wised up!
Life actually, does begin at Fifty.

Dr. Neelkanth Palkar

**लेखक - डॉ. नीलकंठ पालकर**
nrvrpal@aol.com

# किड्स कॉर्नर

### *Cute Little Kitten*

A cute little kitten
Furry like the furriest mitten

Loves to play
Every single day

White like a dove
Loves to love


And her fun is to run!




Sanavi Shingan (10 years old)

लेखिका - सान्वी शिंगण
Sunshine.33472@gmail.com

# किड्स कॉर्नर





**चित्रकर्ती - अनन्या जवंजाळ**

ajawanjal@weissedu.org

# शब्दकोडे

## सागरा प्राण तळमळला



*(उत्तरे जूनच्या अंकात प्रकाशित केली जातील)*

**उभे शब्द**

१. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा समितीचा प्रमुख कोण?
२. वेग शब्दाचा समानार्थी शब्द
३. चित्त शब्दाचा समानार्थी शब्द
४. उपवास केल्याने ह्याची प्राप्ती होते?
५.'टग ऑफ वॉर' ला मराठीत काय म्हणतात?
७. उत्कृष्ट समानार्थी शब्द
८. आरश्यात काय पडते?
१२. दक्षिण आफ्रीकेचे पहीले प्रेसिडेंट कोण?
१३. बाळ गंगाधर टिळक --- मतवादी नेते होते
१५. पाठीत भरते ती
१९. अरबी समुद्रात असलेल्या बेटाच्या समूहास काय म्हणतात?
२१. कोविड १९ विरुद्ध कोणत्या देशाने महामारी रोग कायदा १८९७ लागु केला?
२२. नवरात्रीचा पाचवा दिवस
२५. पाण्यावर चालणारे वाहन
२६. दक्षिण भारतातील एक तिखट पाणीदार पेय
२७. हत्ती स्वार, प्रशिक्षक किंवा रक्षक
२८. एखाद्या पदावर पूर्वी असलेला पण आता नाही असा
२९. साठा किंवा संचय
३२. देवाला स्नान घालण्यासाठी वापरले जाणारे मिश्रण
३३. तेरा पत्त्यांचा खेळ
३७. मराठीचा अभिमान बाळगण्याची वृत्ती
३८. वृत्तांत किंवा गोष्ट
३९. शरीरातील सर्व इन्द्रीयांवर ताबा ठेवणाऱ्या शरीरांतर्गत संस्थेला काय म्हणतात?
४०. शरीराची ती अवस्था ज्यामध्ये तुम्ही तुमचे शरीर आणि मन शांत, स्थिर आणि आनंदी ठेवू शकता
४१. 'फाफट'ची शेपूट
४३. शंकराच्या हातातील वाद्य
४५. स्वगातील अप्सरा

**आडवे शब्द**

६. मराठी ---- पडते पुढे
९. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे टोपण नाव
१०. ---- दमयंती
११. रणांगणावर वीरमरण येणे
१४. घाबरट, भित्रा किंवा माघार घेणारा
१६. कारण किंवा निमित्त
१७. संपुष्ट होणे
१८. ---- कैसा है जनाब का
२०. 'मिलीअन' चा मराठी शब्द
२१. राजकारणी व्यासपीठावरून देतात ते
२२. आर्. डी. बर्मन यांच टोपण नाव
२३. समुद्रात मिळणारा एक मौल्यवान खडा
२४. वि. दा. सावरकरांची प्रसिद्ध कविता
३०. मॅन्स बेस्ट फ्रेंड असं कोणाला म्हणतात
३१. भरतनाट्यम मधील एक नृत्यरचना
३४. अलगुज किंवा बांसुरी
३५. समईचे तेवणे कसे असते
३६. महाभारताचे १८ ---- आहेत
३८. 'पुर्वीचे'च्या विरूद्ध
३९. गाण्यातील तानेला समानार्थी शब्द
४२. कारलं खाल्ले की तोंडाला -- पणा येतो
४४. काकु चा समानार्थी शब्द किंवा काकांची बायको
४६. ओरखडा
४७. शंकराची केली जाणारी पुजा
४८. जगातील सर्वात मोठे महाकाव्य कोणते

**लेखिका - रसिका जोशी**
rasika_j@hotmail.com